रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक ३२५ । पृष्ठे ८ ▌RGD/016/2026-28 www.krushival.in

कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ४ मे २०२६

किंमत ४ ₹

## भूसुरुंग निकामी करताना चार जवान शहीद

**गडचिरोली :** : छत्तीसगड राज्य माओवादमुक्त झाल्याच्या अधिकृत घोषणेला काही दिवस उलटत नाहीत तोच, माओवाद्यांनी पेरलेले आयईडी निकामी करताना झालेल्या स्फोटात डीआरजीच्या (जिल्हा राखीव दल) चार जवानांनी प्राण गमावले. छत्तीसगडच्या कांकेर-नारायणपूर सीमावर्ती भागात २ मे रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास ही घटना घडली. शरणागत माओवाद्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बस्तरच्या घनदाट जंगलात पेरून ठेवलेली स्फोटके नष्ट करण्यासाठी जिल्हा पोलीस आणि डीआरजीच्या जवानांची एक विशेष तुकडी छोटेबेठिया ठाण्याच्या हद्दीत डी-मायनिंग मोहीम राबवत होती. •› पान २ वर

SAEESH COLLEGE
OF COMPUTER SCIENCE
बांधण, पेझारी-नागोठणे रोड, आंबेपुर, अलिबाग
Affiliated to University of Mumbai
Maharashtra Government Recongnized
B.Com Management Studies
पात्रता- १२ वी पास, कालावधी - ३ वर्ष
B.Com Accounting Finance (B.A.F)
पात्रता- १२ वी पास, कालावधी - ३ वर्ष
B.Sc. (Hotel Management)
पात्रता- १२ वी पास, कालावधी - ३ वर्ष
Contact : 8169604575/8237227245

# राज्याच्या तिजोरीला गळती!

## ■ प्रशासकीय नाकर्तेपणाचा फटका ■ ३२ हजार कोटींची धुळधाण

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

एकीकडे राज्याच्या विकासासाठी निधी कमी पडत असल्याचे रडगाणे गायले जात असतानाच दुसरीकडे प्रशासकीय यंत्रणेच्या नाकर्तेपणामुळे महाराष्ट्राच्या तिजोरीचे अक्षरशः वाभाडे निघाले आहेत. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांनी मार्च २०२३ ला संपलेल्या कालावधीचा जो अहवाल मांडला आहे तो राज्याच्या महसूल विभागासाठी मोठा दणका मानला जात आहे. तब्बल ३२,३०७ कोटी रुपयांचा महसूल अद्याप वसूल झालेला नाही, ही बाब राज्याच्या आर्थिक आरोग्यासाठी धोक्याची घंटा आहे.

प्रशासकीय सुस्ती आणि देखरेखीच्या अभावामुळे महाराष्ट्राच्या महसुलाची अक्षरशः




लूट सुरू असल्याचे ताशेरे कॅगने ओढले आहेत. कराची थकबाकी वसूल करण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरले असून, वसुलीसाठी कोणतीही सक्षम यंत्रणा अस्तित्वात नाही, अशा कडक शब्दांत कॅगने सरकारला फटकारले आहे.

### आरटीओ विभागाचा सावळा गोंधळ

परिवहन विभागाची स्थिती तर त्याहून भीषण आहे. हजारो वाहनांचा टॅक्स थकीत असतानाही त्यांच्यावर जप्तीची कारवाई का केली जात नाही? आरटीओचा डेटाबेस अपडेट नसल्याचा फायदा कर बुडव्यांना मिळत आहे. साध्या नागरिकाचे लायसन्स संपले तर दंड वसूल करणारे सरकार, हजारो वाहनांचा कर थकवणाऱ्यांवर मेहेरबान का, असा रोखठोक सवाल कॅगने उपस्थित केला आहे.

विभागाकडे उपलब्ध डेटाचे क्रॉस-व्हेरिफिकेशन होत नसल्याने करचुकव्यांचे फावले आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि डेटा ॲनालिटिक्सकडे दुर्लक्ष केल्याने

### मुद्रांक शुल्कात डल्ला; बिल्डरधार्जिणे धोरण उघड

महसुलाचा कणा असलेल्या मुद्रांक शुल्कात मोठी गळती लागली आहे. अनेक गृहनिर्माण प्रकल्प आणि व्यावसायिक करारांमध्ये रेडीरेकनरचे दर जाणीवपूर्वक चुकीचे लावून शासनाची दिशाभूल करण्यात आली आहे. विकासकांना नियमबाह्य सवलती दिल्या गेल्या आणि अटींचे उल्लंघन होऊनही त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे धाडस महसूल विभागाने दाखवले नाही. यामुळे सर्वसामान्यांकडून कर वसूल करणाऱ्या सरकारला बड्या धेंडांनी मात्र कोट्यवधींचा चुना लावला आहे.

### थकबाकीचा डोंगर की प्रशासकीय सुस्ती?

कॅगच्या अहवालानुसार, राज्याची ३२ हजार कोटींहून अधिक रक्कम विविध विभागांकडे थकली आहे. धक्कादायक म्हणजे यातील १०,३५२ कोटी रुपयांची थकबाकी ही गेल्या पाच वर्षांहून अधिक काळापासून प्रलंबित आहे. वसुलीसाठी पाठपुरावा करण्यात प्रशासन नेमके कुठे कमी पडतेय, असा सवाल आता उपस्थित होत आहे. यामध्ये जीएसटी, विक्रीकर आणि मुद्रांक शुल्काचा मोठा हिस्सा असून २१,९५४ कोटी रुपये हे न्यायालयीन आणि अपिलाच्या कचाट्यात अडकले आहेत. या कायदेशीर लढाया जिंकण्यात सरकारी वकील आणि यंत्रणा कुचकामी ठरत असल्याचे निदर्शनात आल्याचे कॅगच्या अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे.

राज्याचे कायमस्वरूपी •› पान २ वर

## वेधक

### इमारतीला आग; ९ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** दिल्लीतील विवेक विहार भागात एका रहिवासी इमारतीत मध्यरात्री एसीचा स्फोट होऊन भीषण आग लागली. या आगीत ९ जणांचा होरपळून मृत्यू झाला. तर, अनेकजण गंभीररित्या भाजले आहेत. यातील अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांच्या संख्येत वाढ होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. सध्या आग आटोक्यात आणण्यात आली असून घटनास्थळी कुलिंग ऑपरेशन सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये मध्यरात्री एसीचा स्फोट झाल्याने आग लागली. आगीच्या ज्वाळा तिसऱ्या मजल्यापर्यंत पोहोचताच, फ्लॅटमधील रहिवाशांनी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी टेरेसच्या दिशेने धाव घेतली. परंतु, टेरेसचा दरवाजा आतून बंद असल्याने अनेकांचा मृत्यू झाला •› पान २ वर

### सव्वादहा कोटींची फसवणूक

**मुंबई :** सुमारे सव्वादहा कोटींच्या फसवणुकीप्रकरणी दोन बंधूंविरुद्ध एल. टी. मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अविश योगेश जैन आणि आलिश योगेश जैन अशी या दोघांची नावे असून त्यांच्यावर चांदीसह कॅशचा अपहार करुन एका चांदीच्या व्यापाऱ्याची फसवणूक केल्याचा आरोप असल्याचे पोलिसांनी सांगितले. यातील तक्रारदार गिरगाव येथे राहत असून ते चांदीचे व्यापारी आहेत. त्यांची झव्हेरी बाजारात एक खासगी फर्म असून या फर्मच्या माध्यमातून ते होलसेलमध्ये चांदीसह दागिन्यांची विक्री करतात. त्यांच्याकडे अविश जैन हा त्यांच्याकडे कामाला होता. अकाऊंटसह •› पान २ वर

### गोडाऊनला भीषण आग

**पनवेल :** तालुक्यातील नवीन पनवेल अग्निशमन केंद्राला पळस्पे फाटा परिसरातील मारुती सुझुकी शोरूमजवळ तसेच मॅरेथॉन बिल्डिंग शेजारी मुरलीधर इंडस्ट्रीज येथील गोडाऊनला आग लागली. तत्काळ अग्निशमन वाहन घटनास्थळी रवाना करण्यात आले. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचल्यावर गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात आग लागलेली असल्याचे निदर्शनास आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कळंबोली व ओल्ड पनवेल अग्निशमन केंद्राची अतिरिक्त मदत मागविण्यात आली. त्यानुसार आग आटोक्यात आणण्यात आली. अग्निशमन दलाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे आग पूर्णपणे विझविण्यात यश आले. त्यानंतर कुलिंग ऑपरेशनही •› पान २ वर

# नागावच्या मांजरेकर कॉलनीत भीषण आग

## कॉटेजचे मोठे नुकसान;सुदैवाने जीवितहानी टळली



**। नागाव । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नागाव येथील मांजरेकर कॉलनीत रविवारी (दि.३) दुपारी १२ ते १ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे. या आगीत येथील एका कॉटेजचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

नागाव येथील मांजरेकर कॉलनीतील मनोरमा गजानन स्मृती विराज् होमस्टे या कॉटेजला रविवारी भीषण आग लागल्याची घटना घडली. रविवार असल्यामुळे या ठिकाणी आलेल्या काही पर्यटकांनी चेक आऊट केले होते. तर, काही पर्यटक थांबले होते. या कॉटेजच्या •› पान २ वर

# मिनीडोर-इकोची समोरासमोर धडक

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील सहाण बायपास परिसरात रविवारी दुपारी दोन वाहनांमध्ये भीषण अपघात झाल्याची घटना घडली. मिनीडोर आणि इको कार यांच्यात समोरासमोर धडक झाल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी काही जण जखमी झाले आहेत.

रामराज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हिराजी काष्टे यांच्या मालकीच्या इको कारमध्ये सहा प्रवासी प्रवास करत होते. अपघातात सुरेश लांगे या प्रवाशाच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. इतर प्रवाशांनाही किरकोळ मार लागल्याची माहिती मिळाली आहे. दुसरीकडे, खानाव



**सहाण बायपास नजिकची घटना**

**सहा प्रवासी जखमी**

येथील संतोष मगर यांच्या मिनीडोर या वाहनात पाच प्रवासी होते. या वाहनातील प्रवाशांना कोणतीही दुखापत झाली नसून ते सर्व सुरक्षित असल्याचे समजते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व जखमींना तातडीने वैद्यकीय मदत पुरवण्यात आली. या अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## चालत्या विमानातून प्रवाशाने मारली उडी!

**चेन्नई :** चेन्नई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी पहाटे एका प्रवाशाच्या अजब कृत्याने एकच खळबळ उडाली. शारजाहून चेन्नईला आलेल्या एअर अरेबियाच्या विमानातून एका ३४ वर्षीय प्रवाशाने चक्क चालत्या विमानातून खाली उडी मारली. विमान धावपट्टीवरून टॅक्सीवेकडे जात असताना या प्रवाशाने आपत्कालीन दरवाजा उघडला आणि बाहेर उडी मारली. या प्रकारामुळे विमानातील २३१ प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. मिळालेल्या माहितीनुसार, एअर अरेबियाचे हे विमान शारजाहून चेन्नईला आले होते. पहाटे ३:२० च्या सुमारास विमानाने धावपट्टीवर लँडिंग केले. विमान मुख्य रनवे सोडून पार्किंगच्या दिशेने •› पान २ वर

# विधान परिषद निवडणूक अखेर बिनविरोध!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीत शनिवारी भाजपच्या पाच, शिवसेना शिंदे गटाच्या दोन तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा निवडणूक अर्ज वैध ठरला. तर चार अपक्ष उमेदवारांचे अर्ज बाद ठरले. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली असून विजयी उमेदवारांची घोषणा सोमवारी (दि.४) करण्यात येईल.

विधान परिषद निवडणुकीच्या ९ जागांसाठी एकूण १७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. राजकीय पक्षांच्या चार उमेदवारांनी प्रत्येकी दोन अर्ज भरले होते. याशिवाय चार जणांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले होते. या उमेदवारी अर्जांची छाननी झाली. छाननीत राजकीय पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. तर चार अपक्ष उमेदवारांचे अर्ज सूचक आणि अनुमोदक नसल्याने अवैध ठरले.

विधान परिषदेच्या एका जागेच्या पोटनिवडणुकीत भाजपच्या प्रज्ञा सातव यांचा अर्ज वैध ठरला आहे. या पोटनिवडणुकीसाठी एका अपक्ष उमेदवाराने अर्ज भरला होता. या अर्जावर सूचक आणि अनुमोदकाच्या सह्या नसल्याने तो बाद ठरला. या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ४ मे अशी आहे. ही मुदत संपल्यानंतर उमेदवार बिनविरोध निवडून आल्याची घोषणा केली जाईल.


### अर्ज वैध ठरलेले उमेदवार

भाजप : सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार

शिवसेना शिंदे गट : डॉ. नीलम गोऱ्हे, बच्चू कडू

राष्ट्रवादी अजित पवार गट : झिशान सिद्दिकी

शिवसेना ठाकरे गट : अंबादास दानवे



# अंदमानात मान्सून आगमनाची सुचिन्हे

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

अंदमान बेटांवर मान्सून निर्मितीला सुरुवात झाली आहे. देशात सर्वत्र वाऱ्यांचा वेग वाढला आहे. अंदमान बेटांवर मान्सून २१ ते २५ मे दरम्यान दाखल होण्याची शक्यता आहे. राजस्थान, गुजरातमध्ये उष्णतेच्या लाटेसह धुळीचे वादळ सुरू होत आहे. शनिवारपासून देशातील बहुतांश भागांत मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात झाली आहे, तर महाराष्ट्रात विदर्भ आणि मराठवाडा या भागांत ४ मे पासून पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

मे महिना उजाडताच संपूर्ण देशातील वातावरण बदलण्यास सुरुवात झाली आहे. पहाटे वाऱ्यांचा वेग वाढला असून, जम्मू-कश्मीर ते राजस्थानपर्यंत जोरदार वारे वाहत आहेत. तेथे ताशी ६० ते ७०, तर महाराष्ट्रात ताशी ३० ते ३५ इतका वेग आहे. उत्तर भारतात पश्चिमी चक्रवात सक्रिय झाल्याने बहुतांश भागांत मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रातही चार मेपासून मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात होत असून, विदर्भात चार मे, तर मराठवाड्यात पाच मेपासून पावसाला प्रारंभ होत आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मात्र पावसाची शक्यता नाही. दरवर्षी मान्सून अंदमानात २० ते २१ मेदरम्यान येतो. एका मॉडेलच्या अंदाजानुसार तो १४ ते १९ मे, तर दुसऱ्या मॉडेलच्या अंदाजानुसार तो २१ ते २५ मेदरम्यान अंदमान-निकोबार बेटांवर दाखल होईल.

# पर्यटकांनी बहरले रायगडचे किनारे

**। रायगड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र दिनाची सुट्टी, त्याला जोडून आलेला शनिवार-रविवार असा सलग तीन दिवसांचा सुट्टीचा योग, तसेच शाळांच्या परीक्षा संपून लागलेल्या सुट्ट्या या दुहेरी संधीमुळे रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी झाली आहे.

अलिबाग, किहीम, आवास, सासवणे, वरसोली, नागाव, चौल, रेवदंडा, काशिद, मुरुड, श्रीवर्धन, दिवेआगर आणि हरिहरेश्वर या किनाऱ्यांवर हजारो पर्यटक दाखल झाले असून, सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुण्यासह राज्याच्या विविध भागांतून पर्यटक मोठ्या संख्येने रायगडकडे वळले आहेत.

उन्हाचा कडाका वाढला असला तरी समुद्राच्या थंडगार


(छायाचित्र : समीर मालोदे)

पाण्यात डुंबत पर्यटकांनी उकाड्यावर मात करण्याचा आनंद घेतला. विशेषतः लहान मुलांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत होता. समुद्रस्नानासोबतच एटीव्ही राईड्स, बोटिंग, सागरी सफर, घोडेस्वारी आणि उंट सफारी यांचा पर्यटकांनी मनसोक्त आस्वाद घेतला.

पर्यटकांची संख्या वाढल्याने हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि लॉजेस फुल्ल झाल्याचे चित्र दिसून आले. स्थानिक पर्यटन व्यावसायिकांसाठी ही गर्दी 'सुगीचे दिवस' ठरत असून, पर्यटन हंगाम अशा सलग सुट्ट्यांमुळे अधिकच बहरत असल्याचे दिसते. एकूणच, सुट्ट्यांचा फायदा घेत कुटुंबासह बाहेर पडण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे चित्र असून, रायगडचे किनारे पुन्हा एकदा पर्यटकांच्या गर्दीने गजबजले आहेत. थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द •› पान २ वर

## मुंबई - नवी मुंबई विमानतळे जोडण्यासाठी २४ हजार कोटींची मेट्रो

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मेट्रोने जोडण्यासाठी तब्बल २४,००० कोटी रुपयांचा प्रकल्प सिडकोने हाती घेतला असून ३ ते ४ महिन्यांत या प्रकल्पासाठीची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येईल, अशी माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली.

सध्या नवी मुंबईत बेलापूर ते पेंधर ही लाईन १ कार्यरत आहे, जी गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे आणि आतापर्यंत १ कोटी १० लाखांहून अधिक लोकांनी त्याचा प्रवास केला आहे. आता या नव्या मेट्रो मार्गाची एकूण लांबी ३२ किमी असून, त्यापैकी ९ किमी मार्ग हा



अंडरग्राऊंड (भूमिगत) असेल.

ही मेट्रो नवी मुंबई, मुंबई, ठाणे आणि कल्याण-डोंबिवली या सर्व विभागांना मेट्रोच्या जाळ्याने जोडणारी ठरेल. मेट्रो कनेक्टिव्हिटी आणि विस्तार हा विमानतळाच्या पूर्वेला पनवेल शहर, उरण आणि तिसरी मुंबई यांना जोडणारी मेट्रो लाईन उभारली जाईल.

नवीन ३२ किमी लाईनसाठी राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली असून, हे काम पीपीपी तत्त्वावर केले जाणार आहे. •› पान २ वर

**चित्रलेखा पाटील यांचा मोलाचा हातभार | १८ मे पासून रंगणार महोत्सव**

# नाट्यप्रभा महोत्सवातून ग्रामीण रंगभूमीला उजाळा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पीएनपी नाट्यगृहात पीएनपी कलाविकास मंडळ अंतर्गत ग्रामीण रंगभूमी आयोजित नाट्यप्रभा हा ग्रामीण नाट्यमहोत्सव येत्या १८ मे पासून रंगणार आहे. ग्रामीण भागातील नाट्यचळवळीला नवसंजीवनी देणे आणि या कलावंतांना सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे, अशी माहिती पीएनपी नाट्यगृह उपाध्यक्ष, विक्रांत वार्डे यांनी दिली.

ग्रामीण नाटकं ही आपल्या संस्कृतीची मुळं आहेत. गावागावात जपली गेलेली ही परंपरा केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून ती समाजाच्या भावना, संघर्ष आणि वास्तव मांडणारी एक प्रभावी माध्यम आहे. मात्र, अनेकदा या नाटकांना योग्य व्यासपीठ मिळत नाही. हाच विचार लक्षात घेऊन नाट्यप्रभा महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण कलाकारांना व्यावसायिक नाटकांप्रमाणे भव्य आणि दर्जेदार रंगमंच




उपलब्ध करून दिला जात आहे. या महोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण कलाकारांना त्या रंगमंचावर काम करण्याची संधी मिळणार आहे, ज्या रंगमंचावर अनेक नामवंत आणि प्रतिभावान कलाकारांनी आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. ही संधी प्रत्येक कलाकारासाठी प्रेरणादायी आणि अभिमानाची ठरणार आहे असे विक्रांत वार्डे यांनी सांगितले.

प्रत्येक नाटकाला अनुदान देण्याचा उपक्रम राबवण्यात आला असून, नाटक तिकीट पद्धतीवर सादर केले जाणार आहे. आपलं नाटक तिकीटावर आहे ही भावना कलाकारांसाठी अत्यंत महत्त्वाची असते. म्हणूनच अत्यंत नाममात्र देणगीमूल्यात तिकीट उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यातून मिळणारा संपूर्ण निधी संबंधित नाट्यमंडळींनाच दिला जाणार आहे. नाटकाच्या गुणवत्तेत अधिक भर पडावी यासाठी तज्ज्ञ कलाकारांकडून मार्गदर्शन आणि आवश्यक ते सहकार्य देखील दिले जाणार आहे. विशेष म्हणजे, अलिबागमधील अनेक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलाकार या उपक्रमाला सक्रिय पाठिंबा देत आहेत. नेहमीच कलाकारांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहणाऱ्या चित्रलेखा पाटील यांचाही या संपूर्ण महोत्सवाला मोलाचा हातभार लाभणार आहे, असे विक्रांत वार्डे यांनी सांगितले.

या महोत्सवाचे कार्याध्यक्ष प्रतिक पानकर, ग्रामीण रंगभूमीचे अध्यक्ष राजन पांचाळ, देवेंद्र केळुस्कर, अभिनेते दिग्दर्शक सागर नार्वेकर, संचित पानसरे, तन्वी पाटील, उपासना घोसाळकर, प्रमोद पाटील, •› पान २ वर

# सावली सोडणार तुमची साथ

- ■ **१४ मे रोजी असेल अलिबागमध्ये शून्य सावली दिवस**
- ■ **खगोलीय चमत्कार पाहण्याचे अभ्यासकांचे आवाहन**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सावली आपली साथ कधीच सोडत नाही, ही एक म्हण. पण, वर्षातून दोन दिवस असे असतात, की ही सावली तुम्हाला अनुभवता येत नाही. या दिवसाला शून्य सावली दिवस असे म्हटले जाते. सूर्य अगदी ९० अंशाच्या कोनात डोक्यावर येणार असल्याने ७ मे पासून महाराष्ट्रातील विविध ठिकाणी वेगवेगळ्या तारखेला दुपारी १२.०० वाजता सावली बेपत्ता होण्याचा अनुभव घेता येणार आहे.

**शून्य सावलीची संकल्पना**

कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन रेषांच्या मधल्या पट्ट्यातच सूर्यकिरणे क्रमाक्रमाने लंबरूप पडतात. त्यामूळे या भागातूनच वर्षातून दोनदा शून्य सावलीचा



अनुभव घेता येतो. कर्कवृत्ताच्या उत्तरेकडे आणि मकरवृत्ताच्या दक्षिणेकडे सूर्य कधीच डोक्यावर येत नाही. त्यामूळे तेथे नेहमी तिरपी सावली पडते. पृथ्वीचा अक्ष जर सरळ ९० अंश कोनात असता तर विषुववृत्तावरच •› पान २ वर

### कोणत्या दिवशी, कोणत्या जिल्ह्यात

७ मे कोल्हापूर, मिरज, सांगली, १० मे सातारा, अक्कलकोट, ११ मे वाई, महाबळेश्वर, १२ मे बारामती, बार्शी, १३ मे लातूर, १४ मे अलिबाग, दौंड, पूणे, १५ मे मुंबई, १६ मे नगर, कल्याण, नांदेड, ठाणे, १८ मे पैठण, १९ मे जालना, २० मे संभाजी नगर, नाशिक, २१ मे मनमाड, २२ मे यवतमाळ, २३ मे बुलढाणा, मालेगाव, २४ मे अकोला, २५ मे अमरावती, २६ मे जळगाव, भुसावळ आणि नागपूर येथे शून्य सावलीचा अनुभव घेता येणार आहे. या ठिकाणी ठिक दुपारी १२.०० वाजता सूर्य अगदी डोक्यावर येईल.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| RGD/016/2026-2028



# मिसिंग लिंकच्या बोगद्याखाली गुप्त बोगदा

## • बोगद्याचे आव्हानात्मक काम झालं सोपं; भविष्यातही बनणार संकटमोचक!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक अधिक सुलभ होण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) उभारलेला मिसिंग लिंक प्रकल्प येत्या १ मेपासून सुरू होत आहे. मिसिंग लिंकवरील देशातील सर्वाधिक २३.५ मीटर रुंदीच्या बोगद्याच्या खोदकामासाठी खालील बाजूस समांतर लहान बोगदा तयार केला आहे. त्यामुळे एका बाजूला डोंगर, तर दुसऱ्या बाजूला १८० मीटर खोल दरी असतानाही मिसिंग लिंकच्या बोगद्याचे खोदकाम करणे शक्य झाले. तसेच भविष्यात आपत्कालीन परिस्थितीत या बोगद्याचा वापर करता येणार आहे.





सुमारे साडेतेरा किलोमीटरच्या मिसिंग लिंक प्रकल्पासाठी खोपोली एक्झिटच्या पुढे खोल दरीपर्यंत १.६४ किमीचा, तर दरीपासून पुढे कुसगावपर्यंत ८.९६ किमी लांबीचा बोगदा तयार करण्याचे मोठे आव्हान होते. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी अवजड यंत्रसामग्री, स्टील, सिमेंट, कारागीर पोहोचवायचे कसे, खोदकामातून निघणारा मलबा बाहेर काढण्याचाही मोठा प्रश्न होता या पार्श्वभूमीवर या पॅकेजचे काम करणाऱ्या नवयुगा कन्स्ट्रक्शन कंपनीने प्रस्तावित बोगद्याच्या खालील बाजूस मध्यभागी अतिरिक्त बोगदा तयार केला. दरीपासून खोपोली एक्झिटच्या दिशेने जोडणी मार्ग म्हणून समांतर बोगदा तयार केल्याने महाकाय बोगद्याचे काम सोपे झाल्याचे नवयुगा कन्स्ट्रक्शनचे प्रकल्प व्यवस्थापक ईश्वराव के यांनी सांगितले. मिसिंग लिंकवरील हा गुप्त बोगदा भविष्यात संकटमोचक बनू शकतो. मिसिंग लिंकच्या बोगद्यात अपघात झाल्यास किंवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास एका बोगद्यातून दुसऱ्या बोगद्यात जाण्यासाठी व्यवस्था केली आहे.

त्यापेक्षाही काही आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाल्यास समांतर असलेल्या लहान बोगद्यातून दरीत उतरणे शक्य होणार आहे. तसेच बोगद्यात आवश्यक मदत पोहोचवण्यासाठी याचा उपयोग होऊ शकणार आहे.

### १० किलोमीटरचा वळसा वाचला

पॅकेज-१ मध्ये तयार केलेला पहिला बोगदा खोपोली एक्झिटपासून एक किलोमीटर अंतरावर आहे; परंतु काम सुरू करण्यापूर्वी बोगद्याच्या दरीकडील बाजूपर्यंत जाण्यासाठी रस्ताच नसल्याने खोपोलीत जाऊन पुढे १० किलोमीटरचा वळसा घालून उंबरखिंडीतून पुढे दरीत जावे लागते. त्यामध्ये वेळ आणि खर्च जास्त लागत असल्याने आम्ही प्रकल्प आराखड्यात नसतानाही जोडमार्ग म्हणून लहान बोगदा तयार केल्याचे नवयुगा कन्स्ट्रक्शनचे अधिकारी आयुष्य पटेल यांनी स्पष्ट केले.

# विजय तांबडकर यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

'मिशन विजय' अंतर्गत क्रीडा आणि आरोग्य क्षेत्रात आपला आगळावेगळा ठसा उमटविणारे मास्टर विजय चंद्रकांत तांबडकर यांना 'एस.एम.इ.आंतरराष्ट्रीय पुरस्कार -२०२६' ने सन्मानित करण्यात आले.

स्पोर्ट्स मार्शल आर्ट व इंटरटेंमेंट या बहुद्देशीय संस्थेच्या वतीने ग्रॅन्ड मास्टर परवेज खान आणि संपादक जय गोहिल यांच्या हस्ते मुंबईत वाळकेश्वर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला.

१ मे या महाराष्ट्र दिनाचे निमित्ताने मुंबईत वाळकेश्वर येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रम व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यात सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा, आरोग्य व शिक्षण अशा विविध



क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा एस एम इ आंतरराष्ट्रीय पुरस्कार - २०२६ देऊन सत्कार करण्यात आला.

क्रीडा आणि आरोग्य असा दुहेरी संगम करून नवीन पिढीला याचं महत्त्व पटवून देण्यासाठी अनेक वर्षे सेवा देणारे उपचारक व कराटेपटू मास्टर विजय तांबडकर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल संतनी लाइफ केअर फाऊंडेशनचे संचालक संतोष सुर्यवंशी, डॉ. मक्तदिर खान यांनी त्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# रसायनी येथे महापुरुषांचा संयुक्त जयंती महोत्सव

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

विश्ववंदनीय तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध आणि थोर महापुरुषांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा रिस आणि रसायनी परिसरात संपन्न झाला असून, यानिमित्त विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल रंगली होती.

सम्यक सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित या महोत्सवाचे मुख्य उद्दिष्ट महापुरुषांचे विचार जनमानसात रुजवणे हा आहे. या जयंती महोत्सवामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, संत गाडगे बाबा, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले आणि रमाई आंबेडकर यांसारख्या युगपुरुषांच्या आणि क्रांतीज्योतींच्या विचारांना वंदन करून दिवसभराचे नियोजित कार्यक्रम करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी धम्मवंदनेने झाली असून महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळच्या सत्रात लहान मुलांसाठी वक्तृत्व स्पर्धा, मान्यवरांचे मार्गदर्शन आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. नागरिकांच्या मनोरंजनासाठी व प्रेरणा देण्यासाठी भिम-बुद्ध स्वरांजली हा सुश्राव्य संगीताचा कार्यक्रम रात्री जल्लोषात पार पडला. या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी सम्यक सामाजिक संस्थेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आठवडाभर मेहनत घेतली.

हा उत्सव केवळ एक सोहळा नसून सामाजिक ऐक्य आणि समतेचा संदेश देणारे व्यासपीठ आहे, असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या संयुक्त जयंती महोत्सवासाठी नागरिक उपस्थित होते.

# उषा मंगेशकर, हरिहरन, संजीव कपूर, राही भिडे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ पार्श्वगायिका उषा मंगेशकर, पार्श्वगायक हरिहरन, सेलेब्रिटी शेफ संजीव कपूर, अभिनेत्री सुषमा देशपांडे, ज्येष्ठ पत्रकार राही भिडे, दत्ता बारगजे व संध्या बारगजे यांना आज जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले.

विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या लोकांना सन्मानित केल्यास त्यातून समाजाला प्रेरणा मिळते, असे सांगून जीवन गौरव पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थींचे योगदान फार मोठे असल्याचे राज्यपालांनी सांगितले.



सत्काराला उत्तर देताना शेफ संजीव कपूर यांनी लोकांना घरचे भोजन नेहमी चांगले असा मूलमंत्र दिला. घरच्या भोजनात प्रेम असते तर बाहेरच्या भोजनात व्यवहार असतो, असे त्यांनी सांगितले. पार्श्वगायक हरिहरन यांनी यावेळी तू ही रे, तेरे बिना मै कैसे जिऊ हे गाणे सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. आजही महाराष्ट्र उद्योग, सुशासन आणि सामाजिक विकास या क्षेत्रांत देशाचे नेतृत्व करत आहे, असे सांगून विविध आव्हानांना सामोरे जात असताना प्रामाणिकपणा, सेवा आणि समर्पण या मूल्यांचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. आज सन्मानित होत असलेले सर्व व्यक्तिमत्त्वे या मूल्यांचे जिवंत उदाहरण आहेत, असे राज्यपालांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक रमेश बाळाराम पाटील यांचे कडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता. अलिबाग | ११४ | ०-०६-४० जिरायत<br>०-००-०० पो.ख.<br>०-०६-४० एकुण | १.५२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये रमेश बाळाराम पाटील यांच्या नावे असणारे एकुण क्षेत्र ०-०३-२० हे. आर., आकार ० रू ७६ पैसे, हि जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक- ०४/०५/२०२६

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या बागायत मिळकतीमधील विद्यमान मालक नंदकुमार जयवंत बैकर व सुप्रिया नंदकुमार बैकर यांचे मालकीचे क्षेत्र त्यांचेकडून खरेदी घेणेचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकतीमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| २४६१ | ०-४९-६० | १८- ९३ |

पैकी नंदकुमार जयवंत बैकर व सुप्रिया नंदकुमार बैकर यांचे मालकीचे ०-०५-१२ हे. आर. क्षेत्र, आकार रू. २-०१ पै. ही बागायती मिळकत

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- ०३/०५/२०२६

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
''गुरूकृपा'' अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.


## पान १ वरून

### नागाव मांजरेकर कॉलनीत भीषण आग

तिसऱ्या माळ्यावर म्हणजे टेरेस्टवर बांबूचे टेंट हाऊस बांधले होते. या टेंट हाऊसमधून नुकतेच काही पर्यटकांनी चेक आऊट केले होते. त्यानंतर काही वेळातच येथील पर्यटकांना टेरेस्टवर आग लागल्याचे निदर्शनास आले. ही बाब त्यांनी कॉटेज चालकाच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी प्रचंड उन आणि वारा असल्यामुळे ती आग वाढतच गेली. या ठिकाणी असलेल्या पर्यटकांनी ती आग विझविण्याचा अतोनात प्रयत्न केला. मात्र, ही आग आटोक्यात आली नाही. वाऱ्यामुळे या आगीच्या ठिणग्या उडून खाली पहिल्या माळ्याजवळ असलेल्या लाकडी टेंट हाऊसवर पडल्या आणि आगीने रौद्र रूप धारण केले. ही बाब परिसरातील ग्रामस्थांच्या लक्षात येताच त्यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि समाज सेवकांनी त्या ठिकाणी धाव घेतली. त्यांनी देखील आग विझविण्याचे अतोनात प्रयत्न केले. त्यानंतर काही वेळात अलिबाग नगरपरिषदेचे अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले. रविवार असल्यामुळे पर्यटकांच्या परतीच्या मार्गक्रमणामुळे काही प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याने या अग्निशमन पथकाला घटनास्थळी पोहोचायला थोडासा विलंब झाला. जवळपास कोणतेही अग्निशमन पथक नसल्यामुळे या नगरपरिषदेच्या पथकावर अबलंबुन राहावे लागले. या अग्निशमन पथकाच्या प्रयत्नाने पूर्ण आग विझविण्यात त्यांना यश आले. मात्र, या आगीत सर्व काही जळून खाक झाले. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. या आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे.

### राज्याच्या तिजोरीला गळती!

नुकसान होत आहे. अशीच दिरंगाई सुरू राहिली तर विकासकामांना ब्रेक लागेल आणि राज्याला कर्जाच्या खाईत लोटावे लागेल, असा गंभीर इशाराही देण्यात आला आहे. जुन्या पद्धती सोडून तातडीने सुधारणा करा, अन्यथा राज्याची तिजोरी रिकामी होईल, अशा स्पष्ट शब्दांत कॅगने सरकारचे कान उपटले आहेत.

**राज्यात खनिज चोरी आणि पर्यावरणाची राखरांगोळी**

अनधिकृत गौण खनिज उत्खननाबाबत कॅगने ओढलेले ताशेरे अतिशय गंभीर आहेत. रॉयल्टी न भरता राजरोसपणे डोंगरच्या डोंगर पोखरले जात आहेत, तरीही प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. अवैध उत्खनन आणि वाहतुकीमुळे केवळ महसूलच बुडाला नाही तर राज्याच्या पर्यावरणाचाही कायमस्वरूपी ऱ्हास झाला आहे. दंड आकारणीतील त्रुटींमुळे माफियांचे फावले असून त्यांना प्रशासनातील कोणाचे अभय आहे, असा प्रश्न या अहवालामुळे ऐरणीवर आला आहे. कॅगच्या ताशेऱ्यांनी गौण खनिज माफियांचे धाबे दणाणले आहेत. अवैध उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास आणि कोट्यवधींच्या महसुलाची बुडित झाली असून, प्रशासकीय दुर्लक्ष होत आहे.

### पर्यटकांनी फुलले रायगडचे किनारे

असलेले माथेरानही पर्यटकांनी गजबजून गेले आहे.

जिल्ह्यात गेल्या तीन दिवसात ३ लाखांहून अधिक पर्यटक दाखल झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. अलिबागमध्ये मुंबईतून जलमार्गाने दाखल होणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे. दर शनिवार रविवारी गेट वे ते मांडवा दरम्यान १० हजार प्रवाशांची ये-जा होत असते, यात गेल्या दोन दिवसाच जवळपास दुपटीने वाढ झाल्याची माहिती मेरीटाईम बोर्डाच्या सुत्रांकडून देण्यात आली आहे.

सलग सुट्ट्यामुळे अलिबाग तालुक्यात ५० हजार पर्यटक दाखल झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. मुरुड तालुक्यात १५ ते २० हजार माथेरान येथे १५ ते २० हजार श्रीवर्धन तालुक्यात ३० ते ३५ हजार पर्यटक दाखल झाल्याचा अंदाज आहे. ऐतिहासिक रायगड किल्ल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्याही लक्षणीय रित्या वाढली आहे.

**सोयी सुविधांवरचा ताण वाढला**

पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे अर्थकारणाला चालना मिळाली असली तरी पायाभूत सुविधांवरील ताण कमालीचा वाढला आहे. जिल्ह्यात ठिकठिकाणच्या रस्त्यांवर सलग दोन दिवस वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. वाहनांची संख्या अभूतपूर्व पध्दतीने वाढल्याने, वाहतून नियमन करणे जिकरीचे ठरत आहे. मुंबई -गोवा महामार्ग, अलिबाग वडखळ महामार्ग, दिघी माणगाव महामार्ग आणि अलिबाग मुरुड मार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामळे पर्यटक तासंतास अडकून पडत असल्याचे चीत्र पहायला मिळत आहे.

### मुंबई - नवी मुंबई विमानतळे जोडण्यासाठी २४ हजार कोटींची मेट्रो

सध्या पीअर रिव्ह्यूचे काम सुरू असून, निधीसाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठवून निविदा प्रक्रिया लवकरच सुरू होईल. एम-२४ आणि एम-२६ यांसारख्या इतर मार्गांचेही नियोजन आणि डीपीआर तयार असून ते मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवले जाणार आहेत.

एमएमआर क्षेत्रातील प्रवाशांना नवी मुंबई विमानतळ किंवा इतर भागात जाण्यासाठी कोणत्याही अडचणी येऊ नयेत, यासाठी हे मेट्रोचे जाळे लवकरात लवकर उभारण्याचे उद्दिष्ट असल्याचेही विजय सिंघल म्हणाले.

### सावली सोडणार तुमची साथ

नेहमीसाठी शून्य सावली अनुभवता आली असती.

भारताचा विचार केल्यास अंदमान-निकोबार बेटावर इंदीरा पॉइंट येथे ६.७८ अंश अक्षवृत्तावर ६ एप्रिल आणि ५ सप्टेंबर रोजी दुपारी सूर्य अगदी डोक्यावर असतो आणि शून्य सावली दिवस घडतो. पुढे १० एप्रिल आणि १ सप्टेंबर रोजी कन्याकुमारी येथे शून्य सावली दिवस येतो. तो दक्षिण भारतात तेलंगणा येथे २ मे पर्यंत विविध अक्षवृत्तावर असलेल्या शहरात शून्य सावली दिवस पाहता येतो. शेवटी भोपाल जवळ २३.५ अंशावर १८ जून रोजी शून्य सावली दिवस पाहता येतो.लगेच दक्षिणायन सुरु होताच पुन्हा भोपाल ते अंदमान भागापर्यंत पुन्हा पावसाळ्यात शून्य सावली दिवस येतात. परंतु ढग आणि पाउस असल्याने आपल्याला बहुदा हे दिवस अनुभवता येत नाही.

हा क्षण अनुभवण्यासाठी अगदी सोपी पद्धत आहे. त्यासाठी साहित्य म्हणजे दोन, तीन इंच व्यासाचा आणि एक दोन फूट उंचीचा पोकळ प्लास्टिक पाईप, कोणतीही उभी वस्तू ठेवावी किंवा स्वता उन्हात सरळ उभे रहावे. सूर्य अगदी डोक्यावर आला की सावली दिसत नाही. सावलीने थोडा वेळ का होईना साथ सोडलेली असेल. हा एक भौगोलिक, गणितीय आणि वैज्ञानिक प्रयोग आहे. त्यामुळे प्रत्येकाने हा प्रयोग अवश्य पहावा, असे आवाहन खगोल अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांनी केले आहे.

### भूसुरुंग निकामी करताना चार जवान शहीद

ही तुकडी मानक प्रक्रियेनुसार स्फोटके हाताळत होती. या घटनेच्या चौकशीचे आदेश राज्य सरकारने दिले असून फॉरेन्सिक टीमकडून तांत्रिक तपासणी केली जात आहे.

**कानठळ्या बसणारा स्फोटांचा आवाज**

जवानांची तुकडी स्फोटके शोधत असतानाच एका जिवंत भूसुरुंगाचा भीषण स्फोट झाला. हा स्फोट इतका जबरदस्त होता की, परिसरात कानठळ्या बसणारा मोठा आवाज झाला. यामध्ये चार जवान गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ हेलिकॉप्टरच्या साहाय्याने रुग्णालयात हलवण्यात आले.मात्र, दुर्दैवाने उपचारादरम्यान डीआरजी प्रभारी सुखराम वट्टी, कृष्णा कोमरा, संजय गढपाले, परमानंद कोमरा हे चारही जवान शहीद झाले. तीन जवान कांकेर जिल्ह्यातील होते तर सुखराम वट्टी हे विजापूर जिल्ह्यातील रहिवासी होते. माओवादी हिंसाचार थंडावत असल्याचे चित्र असताना, अशा स्फोटांमुळे यंत्रणा पुन्हा एकदा हाय अलर्टवर आहेत.

### इमारतीला आग ; ९ जणांचा मृत्यू

दुसऱ्या मजल्यावर उपस्थित असलेल्या चार व्यक्तींचाही या दुर्घटनेत आपला जीव गमवावा लागला. तर, एका पलंगावर तीन मृतदेह आढळून आले. या दुर्घटनेतील मृतांची ओळख अद्याप पटलेली नसून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

अग्निशमन दलाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, अग्निशमन नियंत्रण कक्षाला पहाटे ३:४७ च्या सुमारास सूचना मिळाली. त्यानंतर अग्निशमनदलाच्या १४ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि इमारतीत अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले. या घटनेत ९ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. तर, ४ जण गंभीररित्या भाजले आहेत. त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### सव्वादहा कोटींची फसवणूक

सेल्सची जबाबदारी होती. काही वर्षांनंतर त्याने त्यांच्यासोबत पार्टनरशीप केली होती. सत्तर लाखांची गुंतवणुक करुन त्याने कंपनीत तीस टक्के पार्टनरशीप घेतली होती. याचदरम्यान त्याच्यासह त्याचा भाऊ आलिश जैन यांनी कंपनीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केले होते. सॉफ्टवेअरमधील नोंदी डिलीट करुन कंपनीला प्रचंड नुकसान होत असल्याचे भासविले होते. गेल्या काही वर्षांत कंपनीला एक कोटीचे नुकसान झाले असून तक्रारदारांना सहा कोटी रुपये देणे बाकी असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न केला होता.

सदर प्रकार संशयास्पद वाटताच त्यांनी सर्व व्यवहारासह बँक स्टेटमेंटची पाहणी केली असता त्यात त्यांना १ कोटी १७ लाख ५० हजार रुपयांचे ४७ किलो चांदीचे ठोकळे, ४ कोटी ७५ लाख रुपयांचे १४६ किलो चांदीचे विविध दागिने तसेच ४ कोटी ३० लाखांचा परस्पर अपहार करुन त्यांची फसवणूक केल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्यांनी या दोन्ही आरोपी बंधूंविरुद्ध एल. टी. मार्ग पोलिसांत तक्रार केली होती. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर आविश जैन आणि आलिश जैन यांच्याविरुद्ध पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

### गोडाऊनला भीषण आग

करण्यात आले. गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात किराणा माल साठवलेला असल्याने जेसीबीच्या मदतीने माल बाजूला काढून काही प्रमाणात चांगला माल वाचविण्यात आला. मात्र, आगीत गोडाऊन पूर्णतः जळून खाक झाले.या कारवाईवेळी उप अग्निशमन अधिकारी अतुल सपकाळ व प्र.अ. विमोचक विकास पालवे उपस्थित होते. गोडाऊनचे मालक विवेक भटरे, परेश केशवजी करावा व राजेंद्र सिंग अशी नावे असून, या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

### नाट्यप्रभा महोत्सवातून ग्रामीण रंगभूमीला उजाळा

नितेश पाटील, ऋषिकेश पडवळ, रवींद्र पाटील, अश्रीता बारसे, संकल्प केळकर, जितेंद्र पाटील, तुषार पाटील (नारंगी) आरती पाठक, हिमालय चोरघे, तुषार पाटील (मेढेखार), विनोद नाईक, अमोल मिठाग्री, दीपक काळेल, अनिष मिठाग्री, मयूर मोरे, साहिल पाटील, यश बनसोडे आणि सर्व सहकारी मनापासून मेहनत घेत आहेत. त्यांच्या या अथक परिश्रमांमुळेच हा महोत्सव अधिक भव्य आणि यशस्वी होणार आहे. हा महोत्सव केवळ नाटक सादर करण्यापुरता मर्यादित नसून, ग्रामीण रंगभूमीला नवसंजीवनी देण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. त्यामुळे प्रत्येक रसिक प्रेक्षकाने शक्यतो या नाटकांना उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, ही अपेक्षा आहे. आपण सर्वांनी या रंगदेवतेच्या पालखीचे खांदेकरी व्हावे. कारण, रंगभूमी जिवंत राहिली पाहिजे याची आपण केवळ चर्चा करत नाही, तर त्यासाठी कृतीही करतो, हे दाखवून देण्याची हीच खरी वेळ आहे. एक कलाकार, एक रसिक आणि एक जाणकार म्हणून आपण सर्वजण या चळवळीत सहभागी होऊया आणि ग्रामीण रंगभूमीचा पताका उंचावूया, असे आवाहन पीएनपी नाट्यगृह उपाध्यक्ष, विक्रांत वार्डे यांनी केले.

### चालत्या विमानातून प्रवाशाने मारली उडी!

संथ गतीने जात होते. विमान पूर्णपणे थांबण्यापूर्वीच, संबंधित प्रवाशाने अचानक आपत्कालीन दरवाजा उघडला आणि खाली उडी मारली. सुदैवाने, विमान संथ गतीने असल्याने प्रवाशाला कोणतीही गंभीर इजा झाली नाही आणि विमानाचेही नुकसान झाले नाही. विमानातील २३१ प्रवाशी होते. विमानतळ अधिकाऱ्यांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, हा प्रवासी प्रवासादरम्यान आजारी होता. विमानात असताना त्याला मळमळत होते आणि त्याने दोनदा उलट्याही केल्या होत्या,असे एका अधिकाऱ्याने सांगितले. कदाचित अस्वस्थ वाटत असल्याने किंवा घाबरल्यामुळे त्याने घाईघाईने विमानातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला असावा, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

या घटनेनंतर वैमानिकाने तातडीने ग्राऊंड कंट्रोलला याची सूचना दिली. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत त्या प्रवाशाला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला पुढील चौकशीसाठी पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे. या प्रवाशाची ओळख अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आली नसली, तरी तो तामिळनाडूचा रहिवासी असल्याचे समजते.


### खोपोली नगरपरिषद

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३,
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११

KMC

जा.क्र.केएमसी/नगर रचना/०६ दिनांक :- २९/०४/२०२६

**खोपोली नगरपरिषद**
**जाहीर प्रकटन**

खोपोली नगरपरिषद हद्दीमधील सर्व रहिवासी मिळकत धारकांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, चालू पावसाळी मौसमामध्ये संभाव्य अतिवृष्टी, वादळ तसेच जमीन खचणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी ज्या मिळकती/इमारती धोकादायक/धोकादायक कड्यांच्या, डोंगरांच्या, टेकडीच्या बाजूला/दरड कोसळण्याची शक्यता असणाऱ्या ठिकाणी झाल्या आहेत अथवा काही भाग धोकादायक झाला आहे, अशा इमारती अथवा मिळकतीमध्ये कोणीही वास्तव्य करू नये. तसेच अशा इमारतींच्या किंवा इमारतींच्या मिळकतींच्या संबंधित घरमालकांनी/भोगवटादारांनी आपल्या मिळकतींचा धोकादायक भाग तातडीने उतरवून घेऊन धोका नष्ट करावा. अशा धोकादायक इमारती/मिळकती संदर्भात महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये ही नोटीस समजण्यात यावी. अशा धोकादायक इमारतीमध्ये जर कोणी वास्तव्य केले तसेच त्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित व वित्तहानी झाली तर खोपोली नगरपरिषद त्याला जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**सहाय्यक नगर रचनाकार**
**खोपोली नगरपरिषद**

## निवडक



### पुलावरील पत्रे काढण्याची मागणी

**नेरळ :** कर्जत रेल्वे स्थानकातील पुणे दिशेकडे असलेला पादचारी पूल प्रवासी वर्गासाठी त्रासदायक ठरत आहे. या पादचारी पुलावर दोन्ही बाजूला लावण्यात आलेल्या लोखंडी पत्र्यामुळे हवा येण्या-जाण्यासाठी कोणताही मार्ग राहिला नाही. त्यामुळे या पुलावरून ये-जा करताना प्रवाशांना गुदमरून जाण्याची भीती वाटत आहे. त्यामुळे हे पत्रे काढून टाकण्याची मागणी प्रवासी वर्गातून होत आहे. मध्य रेल्वेवरील मुंबई-पुणे मार्गावरील कर्जत स्थानकात पुणे दिशेकडे एक पादचारी पूल आहे. या पादचारी पुलाच्या फुटपाथवर पावसाचे पाणी येते, त्यामुहे मध्य रेल्वे कडून या पुलाला लोखंडी पत्रे लावण्यात आले आहेत. त्याआधी या पुलाच्या फुटपाथवर दोन्ही बाजूला लोखंडी जाळी होती. परंतु, पावसाळ्यात पडणारे पाणी वाऱ्यासोबत त्या पुलाच्या फुटपाथवर पडून चालणाऱ्या प्रवाशांना त्रासदायक ठरत होते. मात्र, पावसाळा संपल्यानंतरही हे पत्रे काढण्यात न आल्याने या पुलावरून ये-जा करणे प्रवाशांसाठी धोकादायक बनले आहे. लोखंडी पत्र्यामुळे या पादचारी पुलावरून प्रवास करताना कोणत्याही प्रकारची हवा येण्या-जाण्याची व्यवस्था नाही. परिणामी, काही प्रवाशांना या पुलावरून जाताना भोवळ आली आहे. त्याचवेळी येथे मध्य रेल्वेकडून पंखे देखील लावले नाहीत. त्यामुळे प्रवासी स्वतःच्या हाताने वारा घालून तेथून प्रवास करताना दिसत आहेत. त्यामुळे हे लोखंडी पत्रे पावसाळा संपल्यानंतर काढण्यात यावीत आणि हवा येण्याचे मार्ग खुले ठेवावे, अशी मागणी प्रवासी करीत आहेत.



### कोलाडमध्ये ८ कि.मी. वाहनांच्या रांगा

**धाटाव :** कोकणातले चाकरमानी मुंबईत कामाला असुन, सध्या मुलांना शाळेय सुट्ट्या पडल्याने त्यांनी गावाकडचा रस्ता धरला आहे. तसेच, पर्यटक देखील सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कोकणाकडे मार्गस्थ होत आहेत. दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गावर कोलाड ते खांब दरम्यान अचानक मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. यावेळी तब्बल ८ किमी लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. कोलाडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत फार्ने यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड पोलिसांनी शर्थिचे प्रयत्न करून वाहतूक व्यवस्था सुरळीत केली. मुंबई-गोवा महामार्गावर खांब ते पुढे वरसगावपर्यंत आजही रस्त्याचे काम रखडले आहे. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. मुलांना सुट्टी पडल्याने मोठ्या प्रमाणात पर्यटक आणि चाकरमानी आपल्या गाड्या घेऊन कोकणाकडे निघाले आहेत. दरम्यान, १ मे रोजी कोलाड येथे मोठ्या प्रमाणात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्या दिवशी महाराष्ट्र दिनाची सुट्टी होती आणि पुढे शनिवार-रविवार असल्याने चाकरमान्यांबरोबर पर्यटक सुद्धा कोकणाकडे निघाले होते. त्यामुळे कोलाडसह पूर्ण महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वाहतूक कोंडी झाली होती. ही कोंडी सोडविण्यासाठी कोलाड पोलिसांची प्रचंड दमछाक झाली होती. प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणून त्यांनी शर्तीचे प्रयत्न करून वाहतूक कोंडी सुरळीत ठेवली.

### पाणीपुरवठा सुरळीत होण्याची शक्यता

**माथेरान :** नेरळ येथील उल्हास नदीतून वाढीव पाणी पुरवठा सन १९८९ पासून कार्यान्वित केल्यामुळे याठिकाणी पाण्याची कमतरता भासत नसल्याने पर्यटकांची संख्या वाढलेली आहे. नेरळ येथून पाण्याचा उपसा होताना कुंभे, जुंमा पट्टी, वॉटर पाईप याठिकाणी एकूण तीन पंप बसविण्यात आले आहेत. मागील काही दिवसांपूर्वी वॉटर पाईप रेल्वे स्टेशन भागातील पाणी पंप नादुरुस्त झाल्याने पाणी



पुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे नाईलाजाने येथील शारलोट तलावातून पाण्याचा उपसा केला जात आहे. याकामी वॉटर पाईप पाणी पंप हाऊस येथे नवीन पंप उपलब्ध करून देऊ, असे विद्यमान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी चर्चा करताना स्पष्ट केले. त्यामुळे लवकरच पाणी पुरवठा सुरळीत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याचप्रमाणे नेरळ येथून येणाऱ्या पाण्याच्या पाईप लाईनवर काहींनी अनधिकृतपणे पाण्याच्या जोडण्या टाकून पाण्याचा उपसा करत होते. चंद्रकांत चौधरी यांनी या अनधिकृत पणे लावलेल्या जोडण्या ताबडतोब काढून टाकण्यासाठी सूचना केल्या आहेत. त्यामुळे ज्या-ज्या ठिकाणी अशाप्रकारे पाण्याची गळती संबंधित व्यक्तींकडून केले जात होते, त्याला आळा बसला आहे.

# कर्जमधील निसर्गसंपदा धोक्यात

## टोरंटमुळे सह्याद्री रांगेला धोका; रहिवाशांवर उपासमारीची वेळ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

सह्याद्रीच्या डोंगररांगा तेथील जैवविविधता आणि निसर्गसंपदा यासाठी ओळखला जातो. याच सह्याद्री पर्वत रांगेतील महत्वाच्या असलेल्या बोरघाटाच्या अवतीभवती टोरंटकडून जलविद्युत प्रकल्प उभारला जात आहे. हा प्रकल्प जैवविविधता धोक्यात आणणारा असून पर्यावरण मंत्रालयाने सह्याद्री पर्वत रांगा उद्ध्वस्त करण्यासाठी या प्रकल्पाला मान्यता दिली आहे का? असा प्रश्न शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उपस्थित केला आहे.



सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि निसर्गसंपदा तसेच तिथे राहणारा स्थानिक समाज आज एका मोठ्या संकटाच्या छायेत आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पाली आणि साई डोंगर भागात टोरंट पॉवर या कंपनीचा ३००० मेगावॅट क्षमतेचा पंप स्टोरेज हायड्रो प्रोजेक्ट येऊ घातला आहे. परंतु, हा प्रकल्प स्थानिकांच्या अस्तित्वावर आणणारा ठरत आहे. या प्रकल्पाबाबत त्यांना कोणतीही पूर्वकल्पना देण्यात आली नाही. ग्रामसभेला विश्वासात न घेता, पर्यावरणाचे दाखले मिळवण्यासाठी खोट्या माहितीचा आधार घेतल्याचे ग्रामस्थ आरोप करीत आहेत. हा प्रकल्प येथील पेज नदीवर होत आहे. त्यामुळे येथील संपूर्ण परिसंस्था धोक्यात आली आहे. सह्याद्रीच्या कुशीत आधीच टाटा समूह प्रकल्प उभारत असून, तेथे आणखी एका मोठ्या प्रकल्पाची भर टाकल्याने पर्यावरणाचा समतोल ढासळण्याची भीती वर्तविली जात आहे.

या टोरंट प्रकल्पामुळे येथील निसर्ग आणि वन्यजीवांचा ऱ्हास होण्याची शक्यता आहे. या जलविद्युत प्रकल्पांमुळे भूस्खलन आणि भूकंप होऊ शकतात. सह्याद्रीच्या या संवेदनशील भागात मोठ्या प्रमाणावर ब्लास्टिंग आणि डोंगर पोखरण्याचे काम चालणार आहे. त्यामुळे भूस्खलनाचा धोका वाढणार असून, कोयना धरणासारख्या मानवनिर्मित भूकंपांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली जात आहे. वन्यजीव यांनी नटलेला असा हा भाग भीमाशंकर ते संजय गांधी नॅशनल पार्क यांमधील बिबट्यांच्या स्थलांतराचा महत्त्वाचा मार्ग आहे. प्रकल्पाच्या बांधकामामुळे हा मार्ग खंडित होऊन मानव आणि वन्यजीव संघर्ष वाढू शकतो.

प्रामुख्याने या भागात अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती आणि माशांच्या प्रजाती आहेत, ज्या या प्रकल्पामुळे नष्ट होतील. त्यामुळे येथील आदिवासी, धनगर समाज आणि कातकरी जमात यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ शकते. धनगर समाजाचे लोक पिढ्यानपिढ्या या जंगलावर अवलंबून आहेत. लाकूडफाटा, रानभाज्या, औषधी वनस्पती आणि मासेमारी यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो.सह्याद्री हा केवळ डोंगर नाही, तर तो महाराष्ट्राचा कणा आहे. त्यामुळे टोरंट पॉवरसारख्या प्रकल्पांची गरज खरोखरच आहे का? याचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. निसर्गाचा बळी देऊन मिळवलेली वीज आपल्याला भविष्यात किती महाग पडेल, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. हे लक्षात घेऊन शिवसेना पक्षप्रमुख आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपण टोरंटच्या विरोधात असल्याचे जाहीर केले आहे. प्रसंगी कर्जतमध्ये येऊन आंदोलन करू, असे आव्हान आणि इशारा देखील सरकारला दिला आहे.

### विहिरीत पडलेल्या गायीला जीवदान

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालक्यातील अतिदुर्गम डोंगराळ भागातील महालगुर आडाचीवाडी येथील एका विहरीत गाय पडल्याची घटना घडली होती. ग्रामस्थांच्या प्रयत्नानंतर या गाईला विहिरीतून सुखरूपपणे बाहेर काढण्यात आले.



आडाचीवाडी येथील विहिरीत कचरा पडून नये म्हणून ती हिरव्या रंगाच्या जाळीने झाकण्यात आली होती. येथील विलास उतेकर यांच्या मालकीची गाय शनिवारी (दि.२) सकाळच्या सुमारास या विहरीजवळ आली. गायील हिरव्या जाळीचा अंदाज न आल्याने तिने त्यावर उडी मारली. उडी मारताच ती सुमारे ५० फुट खोल विहरीत कोसळली. सुदैवाने या विहरीत पाणी असल्यामुळे ती पाण्यावर आपटून तरंगत राहिली. हि बाब ग्रामस्थांच्या लक्षात येताच त्यांनी या गाईला बाहेर काढण्यासाठी अथक प्रयत्न केले आणि गाईला सुखरूप बाहेर काढले.



● शनिवार-रविवारच्या सुट्टी दरम्यान मोठ्या प्रमाणात आलेल्या पर्यटकांनी मुरुड समुद्रकिनाऱ्यावर पाण्यात भिजण्यासह, घोडागाडी आणि वॉटर स्पोर्टस्चा आनंद घेतला. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## कर्जतमध्ये इरसालवाडीच्या पुनरावृत्तीची शक्यता

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील दुर्गम भागात असलेली इरसालवाडी एका क्षणात जमिनीमध्ये गाडली गेली आणि अनेकांचे जीव गेले. अशीच घटना कर्जत तालुक्यातील तापकीरवाडी धनगरवाडा येथे टाटा कंपनीच्या कारभारामुळे घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याठिकाणी टाटा कंपनीकडून जलविद्युत प्रकल्पासाठी ६५ एकर जमिनीमध्ये खोदकाम करून पाणी साठवण धरण बांधले जात आहे. दरम्यान, या पाणी साठवण धरणासाठी करण्यात आलेल्या खोदकामाच्या मातीचे डोंगर उभे राहिले आहेत. ते डोंगर काही दुर्दैवी घटनेमुळे तापकीरवाडी धनगरवाडा येथील २२ घरांवर कोसळले तर येथे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



भिवपुरी गावातील टाटा कंपनीच्या मोकळ्या जमिनीवर टाटा पॉवरकडून वीज निर्मिती प्रकल्प उभा राहणार आहे. या ठिकाणच्या जमिनीमध्ये १०० मीटर खोदकाम करून पाणी साठवण करणाऱ्या तलावाची निर्मिती केली जात आहे. टाटा कंपनीकडून येथे वीजेची साठवण करण्यासाठी उदांचन १००० मेगाव्हॅट प्रोजेक्टच्या कामाला २०२५ मध्ये सुरुवात झाली होती. गतवर्षी मे महिन्यापासून प्रचंड प्रमाणात खोदकाम करून ६५ एकर जमिनीमध्ये खोल खड्डा खोदला जात आहे. या ठिकाणी खोदकाम करण्यासाठी अवजड मशिन आणण्यात आल्या आहेत. प्रसंगी सुरुंग स्फोट देखील केले जातात. त्यावेळी निघणारी माती एका बाजूला साठवून ठेवली जात आहे. त्यात एका बाजूला दगड आणि दुसऱ्या बाजूला मातीचे असे इमारती एवढ्या उंचीचे ढीग रचले गेले आहेत. पावसाळ्यात हे मातीचे ढीग प्रसंगी तापकीरवाडी येथील धनगरवाडा यांना जमिनीत गाडू शकतात. त्यामुळे येथील धनगरवाड्याची इरसालवाडी होण्याची भीती स्थानिकांमध्ये आहे.

■ **उत्खननातून निघालेल्या मातीचे मोठंमोठे ढिगारे**



### अपंग मुलासाठी मदतीचा हात

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील वाशी ग्रामपंचायतीत १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधत एक प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. वाशीच्या उपसरपंच कोमल म्हात्रे यांनी त्यांच्या स्वखर्चातून अपंग व गरजू मुलगा भावेश गोपीनाथ पाटील याला तीन चाकी सायकल भेट दिली. भावेशच्या दैनंदिन हालचालींसाठी अत्यंत आवश्यक असलेली ही सायकल मिळाल्याने त्याच्या जीवनात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण समोर आले आहे. या कार्यक्रमावेळी सरपंच संदेश ठाकुर, सेवा निवृत्त पोलीस निरीक्षक विश्वनाथ पाटील, ग्रामसेवक राजेंद्र गुडदे, आशा वर्कर तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

### कौटुंबिक वादातून बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कौटुंबिक वादातून पनवेलमधील एक व्यक्ती राहत्या घरातून कोठेतरी निघून गेली असून, ती व्यक्ती पुन्हा घरी परतलीच नाही. त्यामुळे ती व्यक्ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. हरीषचंद्र बाळु कोळी असे हरविलेल्या व्यक्तिचे नाव असुन, ते पनवेलमधील कलश हील येथील रहिवासी आहेत. त्यांचे वय ६५ वर्षे, उंची ५.५ फुट, बांधा मध्यम, रंग सावळा, चेहरा सरळ, केस पांढरे काळे,




अंगात नेसुन निळ्या रंगाचा शर्ट व खाकी रंगाची पॅन्ट परिधान केलेली आहे. हरीषचंद्र कोळी यांना मराठी व हिंदी भाषा बोलता येते. यांच्याबाबत कोणाला अधिक माहित असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोहवा अतुल देवकर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## खाड्याचा पाडा गावातील विजेचे खांब कोसळले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पाषाणे येथील खाड्याचा पाडा या गावातील विजेचे खांब अचानक कोसळले. त्यामुळे गावातील विजेचा पुरवठा बंद झाला आहे. सुदैवाने यावेळी त्याठिकाणी कोणी नसल्याने जीवीतहानी झाली नाही. दरम्यान, गावातील जूने विजेचे खांब बदलावे यासाठी ग्रामस्थ गेली अनेक वर्षे मागणी करीत होती.



खाड्याचा पाडा या गावात १५० घरांची वस्ती असून या गावामध्ये ३० वर्षांपूर्वी उभारलेले लोखंडी विजेचे खांब अजुनही कायम आहेत. हे खांब पावसाळ्यात भिजून पुर्णतः गंजले होते. ते विजेचे खांब बदलण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून सातत्याने महावितरणकडे केली जात होती. परंतु, महावितरणचे कर्जत उपअभियंता आणि कळंब येथील सहाय्यक अभियंता यांच्याकडून कोणत्याही हालचाली झाल्या नाहीत. त्यामुळे स्थनिकांना आपला जीव मुठीत धरून या जिर्ण विजेच्या खांबाजवळून जावे लागत होते. अखेर धोकादायक स्थितीत असलेले विजेचे खांब अचानक कोसळले. त्यावेळी गावात असलेल्या शुभ कार्यासाठी मंडप बांधण्याचे काम सुरू होते. सुदैवाने त्यावेळी तेथे कोणीही नसल्याने मोठा अपघात टळला. हे जीर्ण विजेचे खांब विद्युत तारांमुळे उभे होते. सध्या संध्याकाळी चांगला वारा सुटत असल्याने हे खांब एकामागून एक कोसळण्याची घटना घडत आहे. दरम्यान, महावितरणकडून खाड्याचा पाडा गावात सिमेंटचे नवीन खांब बसवले जाणार असून हे खांब बसवण्याची कार्यवाही महावितरण कंपनीने वेगाने करावी, अशी मागणी जोर धरत आहे.


**गतवर्षीच्या तुलनेत यंदा किमती वाढल्या | खवय्यांची खरेदीसाठी मोठी गर्दी**

## गावरान कैऱ्या, आंब्यांची मज्जा

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

गावरान कच्च्या कैऱ्या तसेच आंब्यांचा हंगाम सुरू झाला आहे. जिल्ह्यातील बाजारापेठांमध्ये गावरान कैऱ्या व गावरान आंबे विक्रिसाठी आले आहेत. मात्र, यंदा अवकाळीचा फटका व प्रतिकूल हवामानामुळे आवक कमी आहे. परिणामी कैऱ्या आणि आंब्यांचे भाव वाढले आहेत.

रायगड जिल्ह्यातील बहुतांश भागांमध्ये कैऱ्या लागल्या आहेत. तर, अनेक ठिकाणी कैऱ्या परिपक्व झाल्या आहेत. उन्हाळा सुरू झाला की हा रानमेवा जिल्ह्यातील छोट्या मोठ्या बाजारांत उपलब्ध होतो. खासकरून आदिवासी महिलांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतो.



जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आदिवासी महिला, फळ व भाजी विक्रेते कैऱ्या व आंबे घेऊन जवळपासच्या बाजारात विक्रीसाठी घेऊन येत आहेत. काही ठिकाणी किलोने कैऱ्या मिळत आहेत. तर, काही जण नगावर विकत आहे. यावेळी ताई शिद या कैरी विक्रेतीने सांगितले की, माळरान व जंगलात यंदा खूपच कमी आंबे आले आहेत. अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे यंदा कैऱ्या आणि आंब्यांचा भाव वाढला आहे. गतवर्षी ५० रुपयांना पाच ते सहा कैऱ्या असलेला एक वाटा आता ८० ते १०० रुपयांना मिळत आहे. तर, पिकलेल्या गावरान आंब्याचा भाव डजनाला ४०० ते ६०० रुपये असा आहे. मात्र, कैऱ्या आणि आंब्यांचे भाव वाढले असले तरी ते खरेदीसाठी खवय्ये मोठी गर्दी करत आहेत.

**स्थानिकांना रोजगार**

जंगलात व माळरानावर मिळणाऱ्या या गावरान कैऱ्या आणि आंबे स्थानिक तसेच आदिवासी बांधव तोडून स्थानिक बाजारात विकायला आणतात. या कैऱ्या विकून स्थानिकांना विशेषतः महिलांना चांगला रोजगार देखील मिळतो.

**जेवणाची लज्जत वाढवितात**

ताज्या आणि सुक्या मासळीचे कालवण, वरण यामध्ये कैऱ्या टाकल्या जातात. त्यामुळे जेवण रुचकर व लज्जतदार होते. कच्च्या कैऱ्या बारिक कापून मसाला, हळद, तेल आणि मीठ टाकुन खाल्ल्या जातात. तसेच, या कैऱ्यांचा वापर घरगुती लोणचे तयार करण्यासाठी देखील केला जातो. त्यामुळे घराघरांमध्ये लोणच्याच्या तयारीला सुरुवात झालेली दिसत आहे.

### शिंग्रोबा देवाचा उत्सव उत्साहात

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

बोरघाटाचे जनक वीर हुतात्मा शिंग्रोबा देवाचा उत्सव शुक्रवारी (दि.१) खंडाळा घाटात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी पालखी सोहळ्यानंतर विविध कार्यक्रमांनी हा उत्सव दिमाखात पार पडला.

खोपोली शहराच्या घाट माथ्यावर खंडाळा घाटात वीर शिंग्रोबा देवाचे मंदिर आहे. हे अखंड धनगर समाजाचे दैवत आहेत. तसेच, खंडाळा घाटाचे जनक म्हणून देखील त्यांची ओळख आहे. दरवर्षी १ मे रोजी वीर शिंग्रोबा देवाचा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडतो. त्याचप्रमाणे याही वर्षी शुक्रवारी वीर हुतात्मा शिंग्रोबा उत्सव कमिटीच्यावतीने या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिवसभर वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर पालखी सोहळ्याला प्रारंभ करण्यात आला. सायंकाळी महा आरती करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी देवस्थान कमिटीचे संस्थापक अध्यक्ष भरत कोकरे, संस्थापक बबन शेडगे, बबन खरात, बाळासाहेब झोरे, बाळासाहेब आखाडे, दिपक आखाडे, नामदेव हिरवे आदी प्रमुखांसह इतर पदाधिकारी, सदस्यांनी व समाज बांधवांनी मेहनत घेतली होती.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-28



# महागाईची सुरुवात

जगात युध्द होवोत की आणखी काही, भारतात सर्व काही उत्तम चालले आहे असे भासवण्याची नरेंद्र मोदी सरकारची सतत धडपड सुरु असते. पण फाटक्या चादरीने डोके झाकायचे प्रयत्न केले तरी पाय उघडे पडतातच. इराण युध्दानंतर जगात कच्च्या तेलाचे भाव सतत वाढत होते. शिवाय कतार, ओमान व इतर देशांकडून येणारा आपला नैसर्गिक वायूचा पुरवठा बंद झाला होता. त्यामुळे त्याचे भाव वाढणे अपरिहार्य होते. पण मोदींच्या प्राणप्रिय निवडणुका चालू होत्या. त्यातही बंगालमध्ये अत्यंत अटीतटीची लढाई सुरू होती. काय वाट्टेल ते करून तिथे यावेळी भाजपचे सरकार आणण्याची शपथ मोदी आणि अमित शाह यांनी घेतली आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाचा बेगुमान वापर झाला. २७ लाख मतदारांची नावे हटवण्यात आली. राज्यात जणू युध्द सुरु असल्यासारखी सुरक्षा दले तैनात करण्यात आली. आता तिथे सुखोई किंवा राफेल विमानेच पाठवण्याचे बाकी होते. चार मेच्या निकालानंतर तिथे तीन महिने सुरक्षा दलाची पथके ठेवण्यात येणार आहेत. तृणमूलला थोडेसे बहुमत मिळाले आणि फोडाफोडीची वेळ आली तर बंदोबस्तासाठी बहुदा ही तरतूद केलेली असावी. मुद्दा असा की, या लढाईमध्ये पेट्रोल वा गॅसचे भाव वाढवले जाण्याची शक्यताच नव्हती. राहुल गांधी यांनी म्हटलेच होते की, निवडणुकांचे शेवटचे मतदान होताक्षणी हे दर वाढवले जातील. जवळपास तसेच झाले. एक मे रोजी व्यापारी गॅसच्या दरात सिलेंडरमागे तब्बल ९९३ रुपयांची वाढ करण्यात आली. १९ किलोचा हा सिलेंडर यापूर्वी २०७८ रुपयांना मिळत होता. तो आता ३०७१ रुपयांना मिळणार आहे. यापूर्वी मार्च व एप्रिलमध्येही याच्या दरात वाढ झाली होती. पण कालची दरवाढ सर्वात भयंकर आहे. या तीनही दरवाढी मिळून व्यावसायिक एलपीजीचा दर १३०३ रुपयांनी वाढला आहे. पाच किलोच्या सिलेंडरचा भावही ४७ टक्क्यांनी म्हणजे २६१ रुपयांनी वाढवून आता तब्बल ८१० रुपये झाला आहे.

## मजुरांवर संक्रांत

व्यावसायिक सिलेंडर मोठी हॉटेल्स तसेच मिठाई वा फरसाण इत्यादीचे मोठे निर्माते वापरत असतात. पाच किलोचा सिलेंडर रस्त्याकडचे टपरीवाले तसेच शहरांमध्ये एकेकटे राहणारे मजूर किंवा ज्यांच्यापाशी रेशन कार्ड वा आधार कार्डासारखे पुरावे नाहीत असे गरीब वापरत असतात. मोठे वा छोटे हॉटेलवाले यांच्या गॅसची किंमत वाढल्याने साहजिकच आता खाद्यपदार्थ तसेच जेवण इत्यादींच्या किंमती कमालीच्या वाढणार आहेत. तसेही गेल्या महिन्यात या गॅसच्या पुरवठ्यावर बंधने आणल्यापासून अनेक हॉटेल्स बंद झाली होती वा त्यांनी देऊ करीत असलेले खाद्यपदार्थ कमी केले होते. अनेक शहरांमध्ये रोज बाहेर खाणाऱ्या किंवा पाच लिटरच्या सिलेंडरच्या आधारे स्वतः खाणे बनवणाऱ्या मजुरांना नोकरीधंदे सोडून गावी जाण्याखेरीज पर्याय उरलेला नाही. गेल्या महिन्यात सुरत व दिल्लीसारख्या शहरांमधून असे मजूर मोठ्या प्रमाणात शहरे सोडण्यासाठी बस व रेल्वे स्टेशन्सवर गर्दी करीत असल्याचे फोटो सर्वत्र प्रसिध्द झाले होते. मुंबईतूनही खूप मोठ्या प्रमाणात लोकांनी बाहेरची वाट धरली आहे. काहीच दिवसात अलिबाग, पेण किंवा उरणसारख्या ठिकाणीही याचा परिणाम जाणवू लागेल. याही ठिकाणी रोजगाराच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात परप्रांतीय आलेले आहेत. व्यावसायिक गॅसचा उपयोग उद्योगांमध्येही होतो. तिथली कामेही एकतर ठप्प झाली आहेत किंवा त्या कामांचे दर वाढणार आहेत. या सर्वांचा गंभीर परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार आहे. सार्वत्रिक भाववाढ होणार आहे. दुसऱ्या बाजूला असंख्य लोक बेकार झाल्याने बाजारातील मागणीही कमी होणार आहे. त्याचा नेमका काय परिणाम होईल हे कळायला काही वेळ जाणार आहे. याच दरम्यान पेट्रोल व डिझेलची दरवाढ होण्याचीही शक्यता आहे. मोदी सरकारने बराच काळ ही वाढ रोखून ठेवलेली आहे. अर्थात हे वाक्यही फसवे आहे. मुळात कोरोनाच्या काळात जागतिक पातळीवर क्रूड तेलाचे भाव नीचांकी म्हणजे ४० ते ५० रुपये प्रतिबॅरल झालेले असूनही मोदी सरकारने तेव्हा देशातील पेट्रोलचे दर घटवले नव्हते.

## मोदी सरकारची दडपादडपी

वास्तविक आपल्या देशातील तेलाचे दर जागतिक दरांशी जोडले जाण्याचे धोरण त्यापूर्वीच घेण्यात आले होते. त्यामुळे सरकारवर सबसिडीचा बोजा कसा कमी झाला आहे याचा गाजावाजा मोदींनी केला होता. पण त्यावेळी क्रूड तेलाचे दर सतत वाढतच जातील असे गृहित होते. पण ते कमालीचे खाली येऊ शकतील व सरकारी कंपन्यांना देशांतर्गत पेट्रोलचे दर कमी करावे लागू शकतील असे कधी वाटले नव्हते. प्रत्यक्षात कोरोनामध्ये तशी वेळ आली तेव्हा यांना ग्राहकांकडून नफा उकळण्याची चटक लागलेली होती. तो नफा कमी करावा असे सरकारला व कंपन्यांना वाटले नाही. त्याचाच परिणाम म्हणून जगात सर्वत्र तेलाचे कमी झालेले असताना भारतात मात्र हे दर शंभर रुपये लिटरच्या पलिक़डे गेले होते. ते आजही जवळपास तिथेच आहेत. आता पुन्हा हे दर वाढणार असून त्यासाठी इराण युध्दाचे निमित्त सरकारकडे आहे. त्याचा महागाईवर व देशाची अर्थस्थितीवर किती गंभीर परिणाम होईल याचा अंदाज बांधणे सध्या तरी कठीण आहे. कारण, मुळात युध्द आणखी किती दिवस चालेल हेच कोणी सांगू शकत नाही. डोनाल्ड ट्रम्प रोज नवी विधाने करीत आहेत. एक दिवस ते इराणला नष्ट करण्याची धमकी देतात. तर दुसऱ्या दिवशी युद्ध लवकरच संपणार असल्याचे जाहीर करतात. खुद्द अमेरिकेकडे स्वतःला पुरेल इतके तेल व गॅस आहे. चीनकडे प्रचंड पैसा आहे. बोंब होणार आहे ती भारतासारख्या देशांचीच. वाईट हे आहे की नरेंद्र मोदी सरकार जनतेला विश्वासात घेऊन हे सर्व सांगत नाही. जगभर कोरोनाचा प्रसार होत असताना मोदी सरकार मात्र भारतात कोरोना नाही असे सांगण्यात मग्न होते. नंतर कोरोनातील मृत्यूंची संख्या दडपण्याचा प्रयत्न झाला. त्याच रीतीने तेलाच्या दरवाढीचे नेमके परिणाम काय व सरकार त्याला कसे तोंड देणार आहे हे मोदी कधीही नीटपणे सांगणार नाहीत. एकीकडे भारत ही जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे अशी शेखी हे मिरवतात. पण प्रत्यक्षात इथे रेशनवर फुकट मिळणाऱ्या धान्यावर ८० लाख लोक अवलंबून आहेत. याखेरीज लाडकी बहीणसारख्या फुकट पैसे वाटण्याच्या योजना सर्व राज्यांमध्ये चालू करण्यात आलेल्या आहेत. त्यांचा बोजा प्रचंड वाढला आहे. राज्य सरकारांनी घेतलेली कर्जे व त्यांच्यावरच्या व्याजाचे प्रमाण भयावह आहे. धारावीच्या झोपडपट्टीपासून नवी मुंबईच्या विमानतळापर्यंत हर तऱ्हेच्या जमिनी अदानीला बहाल केल्या जात आहेत. दुसरीकडे अंबानीला रशियाचे स्वस्त तेल मिळाल्याने त्याची कंपनी मालामाल होत आहे. या दोघांसारखे काही मूठभर लोक अब्जाधीश होत चालले आहेत. तर बहुसंख्य जनता कंगाल वा बेरोजगार आहे वा होऊ घातली आहे. गॅसची दरवाढ ही त्याची केवळ सुरुवात आहे.

विचार

# एकिकडे महागाई, दुसरीकडे वाढती मागणी

***युद्धामुळे अर्थव्यवस्थेवर पडणाऱ्या ताणाऐवजी महागाईच्या बातम्या पुन्हा ऐकायला मिळू लागल्या आहेत! या श्रेणीमध्ये बिस्किट, साबण, शाम्पू महागणार असल्याची बातमी समोर आली आहे. दरम्यान, विमानांच्या इंधनातही इथेनॉल वापरले जाणार असल्याची तसेच स्मार्टफोन उत्पादनात भारतीय कंपन्यांचा झेंडा जगभर फडकवला जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे. याखेरीज इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढल्याचेही दिसून आले आहे.***




महेश देशपांडे

युद्धजन्य परिस्थितीमुळे व्यापारावर होणाऱ्या परिणामाच्या बातम्या एव्हाना कमी होत असून नेहमीच्या महागाईच्या, दरवाढीच्या बातम्या ऐकायला मिळू लागल्या आहेत. या श्रेणीमध्ये बिस्किट, साबण, शाम्पू महागणार असल्याची बातमी समोर आली आहे. दरम्यान, विमानांच्या इंधनातही इथेनॉल वापरले जाणार असल्याची तसेच स्मार्टफोन उत्पादनात भारतीय कंपन्यांचा झेंडा जगभर फडकवला जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे. याखेरीज इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढल्याचेही दिसून आले आहे.

अर्थनगरीतील बातम्यांचा सविस्तर आढावा घेताना लक्षात येणारी महत्वपूर्ण बातमी म्हणजे केंद्र सरकारने 'एव्हिएशन टर्बाइन फ्युएल' (एटीएफ) मध्ये इथेनॉल मिसळण्यास मंजुरी दिली आहे. याबाबत एक अधिसूचना जारी करण्यात आली आहे. आता इथेनॉल व्यतिरिक्त इतर कृत्रिम किंवा मानवनिर्मित हायड्रोकार्बन्सदेखील 'एटीएफ' मध्ये मिसळले जाऊ शकतात. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने एका राजपत्र अधिसूचनेद्वारे 'एटीएफ' च्या विपणनासंबंधीचे नियम अद्ययावत केले आहेत आणि त्याच्या अंमलबजावणीच्या तरतुदी सुधारित फौजदारी प्रक्रियांनुसार आणल्या आहेत. हा निर्णय अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत जारी केलेल्या 'एव्हिएशन टर्बाइन फ्युएल' (विपणन नियमन) आदेश २००१ मधील सुधारणांनंतर घेण्यात आला आहे. सरकारने अद्याप या नियमासाठी कोणतेही तात्काळ अनिवार्य लक्ष्य निश्चित केलेले नाही. शिवाय या अधिसूचनेत कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नाही. आतापर्यंत विमाने केवळ पारंपरिक तेलावर चालत होती; परंतु आता कृत्रिम इंधन मिसळल्याने त्यांचा खर्च कमी होईल. कारण परदेशातून आयात होणाऱ्या महागड्या कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. कच्च्या तेलाचा वापर कमी होईल, तेव्हा विमान कंपन्यांचा खर्च कमी होईल आणि विमानभाडे स्वस्त होईल. प्रदूषण कमी करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. या पावलामुळे भारत निव्वळ-शून्य उत्सर्जन साध्य करण्याच्या अधिक जवळ जाईल. विमानांमध्ये प्रदूषण कमी करणारे इंधन वापरले जाईल, तेव्हा आकाश स्वच्छ राहील.

दरम्यान, भारतासमोर इंधन संकटानंतर आता खाद्यतेलाचा प्रश्नही गंभीर होत असल्याचे चित्र आहे. जगात आणि आपल्याकडे पाम ऑईलचा तुटवडा वाढत आहे. भारत हा पाम ऑईल आयात करणारा जगातील सर्वात मोठा देश आहे. देशात दर वर्षी सुमारे ९.५ दशलक्ष टन पाम ऑईलचा वापर होतो, तर देशांतर्गत उत्पादन चार लाख टनांपेक्षाही कमी आहे. त्यामुळे भारताला आपल्या गरजेपैकी बहुतांश पाम ऑईल परदेशातून आयात करावे लागते. पाम ऑईल ताडाच्या झाडांपासून तयार केले जाते. या झाडांना मोठ्या प्रमाणात पाऊस आणि पाण्याची गरज असते. दक्षिण-पूर्व आशियात ताडाच्या झाडांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून, तेथूनच पाम ऑईलचे उत्पादन करून जगभर निर्यात केली जाते. भारत प्रामुख्याने इंडोनेशिया आणि मलेशिया येथून पाम ऑईल आयात करतो.

याच सुमारास इंडोनेशियाने महत्त्वाचा निर्णय घेत आपल्या देशात तयार होणारे पाम ऑईल निर्यातीऐवजी देशांतर्गत बायोडिझेल (बी ५०) निर्मितीसाठी वापरण्यास सुरुवात केली आहे. भारत आपल्या आयातीपैकी सुमारे ९० टक्क्यांहून अधिक पाम ऑईल आयात करतो. त्यातील जवळपास निम्मा हिस्सा इंडोनेशियाकडून येतो. या निर्णयामुळे जागतिक बाजारात दर वर्षी १५ ते २० लाख टन पाम ऑईलची कमतरता निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पाम ऑईलचा वापर केवळ स्वयंपाकासाठी नव्हे, तर विविध औद्योगिक उत्पादनांमध्ये कच्चा माल म्हणूनही मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे त्याच्या तुटवड्याचा थेट परिणाम अनेक वस्तूंच्या किमतींवर होणार आहे. साबण आणि शॅम्पूमध्ये फेस निर्माण करण्यासाठी पाम ऑईलचा वापर केला जातो. तसेच लिपस्टिक, क्रीम-लोशन यांसारख्या सौंदर्यप्रसाधनांमध्येही पाम ऑईलचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. बिस्किटे आणि चिप्ससारख्या बेकरी आणि तळलेल्या पदार्थांमध्येही त्याचा मोठा वापर असल्याने पार्ले प्रॉडक्टस आणि ब्रिटानिया इंडस्ट्रिज यांच्या उत्पादनांच्या किमतीमध्येही वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

देशात तयार होणाऱ्या एकूण स्मार्टफोन्सपैकी सुमारे २५ टक्के म्हणजेच प्रत्येक चारपैकी एक फोन आता देशी कंपन्यांकडून बनवला जात आहे. पूर्वी या क्षेत्रावर परदेशी कंपन्यांचे वर्चस्व होते; मात्र आता भारतीय उत्पादक कंपन्या हळूहळू आपली मजबूत पकड निर्माण करत आहेत. निर्यातीतील मोठी वाढ हे या वाढीमागील प्रमुख कारण मानले जात आहे. 'इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग सर्व्हिसेस' क्षेत्रात 'डिक्सॉन टेक्नॉलॉजीज' ही कंपनी १९ टक्के मार्केट शेअरसह अव्वल स्थानी पोहोचली आहे. कंपनीच्या उत्पादनात मोठी वाढ झाली असून मोटोरोला, रिअलमी आणि शाओमी यांसारख्या कंपन्यांकडून मिळालेल्या ऑर्डर्समुळे तिची प्रगती झाली आहे. फॉक्सकॉन ही कंपनी १६ टक्के शेअरसह दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि 'ॲपल'साठी होणाऱ्या निर्यातीमुळे तिचा फायदा झाला आहे. 'सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स'चा मार्केट शेअर काहीसा घसरला आहे. 'भगवती प्रॉडक्टस' या देशी कंपनीनेही नऊ टक्के शेअरसह टॉप पाचमध्ये स्थान मिळवले आहे. विवो आणि ओपो यांसारख्या ब्रँड्सकडून मिळालेल्या मॅन्युफॅक्चरिंग कामामुळे कंपनीला वाढ मिळाली आहे. २०२५ मध्ये भारतातील स्मार्टफोन उत्पादनात आठ टक्के वाढ झाली, तर निर्यातीमध्ये २८ टक्क्यांची मोठी वाढ झाली; मात्र देशांतर्गत मागणी जवळपास स्थिर राहिली असून विक्रीमध्ये केवळ एक टक्क्याची वाढ झाली आहे. या वाढीमागे केंद्र सरकारची 'पीएलआय' योजना, परदेशी गुंतवणुकीवरील सवलती आणि कंपन्यांचे आउटसोर्सिंग धोरण हे महत्त्वाचे घटक आहेत. विशेषतः ओप्पो आणि विवो यांनी उत्पादन बाहेर देण्याची रणनीती स्वीकारल्याने देशी कंपन्यांना मोठ्या प्रमाणात काम मिळाले.

आता एक लक्षवेधी बातमी. पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतात इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) मागणीमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे इंधनाच्या उपलब्धतेबाबत आणि किमतीतील संभाव्य वाढीबाबत ग्राहकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. त्यामुळे भारतीय ग्राहक आता पेट्रोल-डिझेल वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांना अधिक प्राधान्य देत आहेत. 'फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशन' (फाडा) ने 'वाहन' पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे दिलेल्या माहितीनुसार, नवीन कार विक्रीमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वाटा फेब्रुवारीतील ३.५ टक्क्यांवरून वाढून मार्चमध्ये ५.१ टक्क्यांवर पोहोचला आहे. यामुळे 'ईव्ही' सेगमेंटमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'टाटा मोटर्स'च्या प्रवासी वाहन विभागाचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश चंद्रा यांनी सांगितले, की इंधनाच्या किमती आणि उपलब्धतेबाबत असलेली अनिश्चितता ग्राहकांच्या निर्णयावर प्रभाव टाकत आहे. त्यांच्या मते गेल्या महिन्यात कंपनीच्या इलेक्ट्रिक कारच्या मागणीमध्ये सुमारे तीस टक्क्यांची वाढ झाली असून याला पश्चिम आशियातील परिस्थितीबाबतची चिंता कारणीभूत आहे.

'जेएसडबल्यू एमजी मोटर इंडिया'चे व्यवस्थापकीय संचालक अनुराग मेहरोत्रा यांनीही हीच बाब अधोरेखित केली. त्यांनी सांगितले, की सध्या शोरूममध्ये येणारे ग्राहक इलेक्ट्रिक वाहनांना पहिली पसंती देत आहेत. आधी निर्णय घेण्यात संकोच करणारे ग्राहकदेखील आता वेगाने 'ईव्ही'चा पर्याय स्वीकारत आहेत. मार्च महिन्यात कंपनीने ग्राहकांच्या पसंतीमध्ये २६ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. 'वाहन' पोर्टलनुसार मार्च महिन्यात इलेक्ट्रिक कार नोंदणीमध्ये मोठी झेप घेतली असून ती मागील वर्षाच्या तुलनेत ६८ टक्क्यांनी वाढून २२ हजार ४९० युनिट्सपर्यंत पोहोचली आहे. वाढीचा हा कल अशा वेळी दिसून आला आहे, जेव्हा जागतिक बाजारात तेल आणि गॅसच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रिक वाहनांचा पर्याय ग्राहकांना अधिक सुरक्षित आणि किफायतशीर वाटत आहे. 'जेएसडबल्यू एमजी मोटर इंडिया कंपनी'ने आपल्या 'न्यू एनर्जी' वाहनांच्या पोर्टफोलिओचा विस्तार, उत्पादन क्षमता वाढवणे, स्थानिकीकरणाला चालना देणे आणि चार्जिंग सुविधांचा विकास करण्याची योजना आखली आहे. जागतिक स्तरावरही अशीच स्थिती असून, युरोप आणि अमेरिकेसारख्या बाजारपेठांमध्ये पेट्रोलच्या वाढत्या किमतीमुळे इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत आहे. तज्ज्ञांच्या मते सध्याची परिस्थिती कायम राहिल्यास आगामी काळात 'ईव्ही' क्षेत्रात आणखी वेगाने वाढ होण्याची शक्यता आहे.

चर्चा आजची

# गुन्हेगारांऐवजी मुलींनाच डांबून ठेवण्याची गरज?

वैष्णवी वाडकर

राज्यात १ मे रोजी महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा केला जात असताना पुण्यातील भोर तालुक्यात एक काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली. भोर तालुक्यातील एका साडेतीन वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून तिची निघृणपणे हत्या करण्यात आली. ही चिमुरडी घराबाहेरील अंगणात खेळत असताना एका ६५ वर्षीय नराधमाने तिला वासरू दाखवतो, असे आमिष दाखवून गोठ्यात नेले. तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर दगडाने ठेचून तिचा खून केला आणि तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेवला. या घटनेनंतर राज्यात संतापाची लाट उसळली आहे. साडेतीन वर्षाच्या मुलीवर बलात्कार करणाऱ्या माणसाची मानसिकता किती क्रूर असावी? हे या घटनेवरून स्पष्ट होत आहे. अशा सततच्या घटनांमुळे आज आपल्या देशात लहान मुलींना साधे बाहेर खेळण्याचे देखील स्वातंत्र्य उरलेले नाही. दिवसेंदिवस या घटनांत वाढ होत असून गुन्हेगार मात्र मोकाटच फिरत आहेत. त्यामुळे प्रत्येक आई-वडीलांना, गुन्हेगारांऐवजी मुलींनाच डांबून ठेवण्याची गरज आहे का, असा एकच भीतीदायक प्रश्न पडत आहे.

भारतात दररोज सरासरी ८६ ते ८७ बलात्काराच्या घटना नोंदवल्या जातात. याचाच अर्थ देशात दर १८ मिनिटांनी एका बलात्काराची नोंद होते. त्यातील केवळ २७ ते ३० टक्के प्रकरणांमध्ये आरोपींना प्रत्यक्ष शिक्षा होते. म्हणजेच १०० पैकी ७० पेक्षा जास्त आरोपी पुराव्याअभावी किंवा इतर कारणांमुळे सुटतात. देशात एवढ्या मोठ्या प्रमाणात बलात्काराच्या घटना घडत असताना या प्रकरणातील आरोपींना शिक्षा देण्याची प्रक्रिया अगदीच संथ गतीने चालते. या प्रकरणांचे निकाल लागेपर्यंत आणखी नवीन घटना समोर येतात आणि अगदी अलगदपणे आधी घडलेल्या बलात्काराच्या प्रकरणांवर पडदा टाकला जातो. दरम्यान, भोर तालुक्यात साडेतीन वर्षीय मुलीवर झालेला बलात्कार खरंच चिंताजनक आहे. त्या मुलीचे आयुष्य अगदी बाहुली आणि भांडीकुंडींपर्यंत मर्यादित होते. तिला ठावूकही नसेल आपल्यासोबत झाले तरी काय? या मुलीवर बलात्कार प्रकरणातील आरोपीचे नाव भीमराव कांबळे (६५) असे आहे. लहान मुला-मुलींना चॉकलेट, खेळणी आणि प्राण्यांची खास आवड असते. याच आवडीचा फायदा घेऊन ६५ वर्षीय भीमराव कांबळे याने या चिमुरडीला वासरू दाखवतो, असे आमिष दाखवून गोठ्यात नेले. तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर दगडाने ठेचून तिचा खून केला आणि तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेवला.

हा आरोपी गुन्हेगारी पार्श्वभूमीचा आहे. त्याच्यावर या आधी देखील विनयभंग आणि अत्याचाराच्या गुन्ह्यांची नोंद आहे. याच गुन्हेगाराविरोधात ७५ वर्षांच्या वृद्धेचा विनयभंग केल्याबद्दल आणि स्वतःच्या पुतणीवरही अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला होता. स्थानिकांच्या आणि प्राथमिक तपासातील माहितीनुसार, २०१५ च्या गुन्ह्यात अटक झाल्यानंतर तो काही काळ तुरुंगात होता; मात्र, त्यानंतर न्यायालयाने त्याचा जामीन मंजूर केला होता. मुळात एवढे गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आरोपींना कोणत्या आधारावर जामीन दिला जातो? असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित होत आहेत. त्याच्या याच संशयास्पद वागणुकीमुळे त्याला यापूर्वी गावातून हद्दपारही करण्यात आले होते. आरोपीला शिक्षा पूर्ण होण्याआधीच किंवा वारंवार जामीन मिळाल्यामुळे तो समाजात मोकाट फिरत होता आणि त्याने पुन्हा असा भयंकर गुन्हा केला, अशी चर्चा आहे. त्यामुळे राज्यभर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

आज नव जन्माला आलेल्या मुलींपासून अगदी ८० वर्षांची वयोवृद्ध महिलादेखील या देशात सुरक्षित राहिलेली नाही. बहुतांश वेळा बलात्कार करणारे हे महिलांच्या नात्यातले असतात किंवा आजूबाजूच्या परिसरातले असतात. त्यामुळे कोणावर विश्वास ठेवावा? हा महिलांसह आई-वडीलांसाठी मोठा प्रश्नच आहे. भोरमधील ६५ वर्षीय राक्षसाने त्या निरागस मुलीचे आयुष्य अगदी काही मिनिटात संपवले. आज तिचे आई-वडील हतबल झाले असून राज्य सरकारकडून न्यायाची अपेक्षा करत आहे. या घटनेनंतर संतप्त झालेल्या आई-वडिलांनी आणि ग्रामस्थांनी मुलीचा मृतदेह पुणे-सातारा महामार्गावर ठेवून रास्ता रोको आंदोलन केले. जोपर्यंत आरोपीला फाशीच्या शिक्षेचे लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत पालकांनी अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला होता. अखेर नसरापूर प्रकरणातील चिमुरडीच्या आरोपी विरोधात फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी पार पडणार आहे. आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्यानंतर मध्यरात्री पोलीस बंदोबस्तात चिमुरडीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. मात्र, आता सरकारने फक्त आश्वासन न देता त्या आरोपीला खरंच फाशीची शिक्षा देणे गरजेचे आहे. 'कारण अभी नहीं तो कभी नहीं' अशी परिस्थिती आता निर्माण झाली आहे. जर अशा नराधमांना पुन्हा जामीन मिळाला किंवा त्यांची सुटका झाली तर दुसरी एखादी मुलगी त्यांचा शिकार ठरेल. त्यामुळे आता वेळ आली आहे ती गुन्हेगारांना कायमचे डांबून ठेवण्याची, मुलींच्या स्वातंत्र्याला नाही!

लोकसंसद

## कोकणचे मागासलेपण दूर करणाऱ्या नेतृत्वाचा अभाव!

कोकणाला ६७ वर्षात मागासलेपण सहन करण्याची वेळ त्या-त्या वेळी नेतृत्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींमुळे आली. कोकण विभाग महाराष्ट्रातील इतर विभागांपेक्षा कितीतरी पटीने मागे आहे. याचे कारण कोकणातील मतदार नेहमीच शासन कर्त्यांच्या विरोधात मतदान करीत आला.कोकण विभागात ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे आहेत. शिवसेनेने १९९० च्या शतकात कोकणात प्रवेश केला. तेव्हा कोकणातील नव्याने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य, वीज, पाखाड्या, ग्रामपंचायत कार्यालये, तलाठी कार्यालये, डाक घर, पारपत्र, छोटे रस्ते, मोठे रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, न्यायालये, तालुक्यातील एस.टी.आगार बांधणे, पूल, कालवे, इत्यादी लोकहिताची कामे केली. सर्वात जास्त काळ खासदार होते मधु दंडवते, सूरेश प्रभू, अनंत गीते. दंडवते अहमनगर जिल्ह्यातील होते पण निवडून राजापूर लोकसभा मतदारसंघातून निवडून यायचे. त्यांच्याच अथक प्रयत्नानंतर कोकण रेल्वे कोकणातून धावली.त्यांना साथ जॉर्ज फर्नांडिस यांची लाभली.सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या जागा रेल्वे प्रकल्पाला दिल्या आहेत. तरीही शेतकरी विकासाची स्वप्ने पाहू शकला नाही. विकास झाला दुसऱ्या राज्यातील लोकांचा. कोकण रेल्वे प्रकल्पाचे नाव 'कोकण रेल्वे' ठेवून कोकणातील माणसाला खूष केले. कोकण रेल्वे सुरु झाल्यापासून लाभ कोकण ऐवजी गोवा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ आणि उत्तरे कडील राज्यांना झाला. कोकण रेल्वे मार्गावरील टर्मिनस, गाड्या, त्यांच्या वेळा, त्यांचे थांबे इत्यादी परप्रांतीयांच्या सोईचे. कोकणातील जनतेच्या नशीबी पॅसेंजर गाड्या त्यांच्या वेळाही सोईच्या नाहीत. दादर रत्नागिरी पॅसेंजर बंद करून ती उत्तरेकडे सुरू करण्यात आली. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ चे बांधकाम गेली सतरा वर्षे पूर्ण करता आले नाही. पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी आपल्या विभागांचे सोने केले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार यांच्यासारखे नेतृत्व कोकण टिकले नाही की टिकू दिले नाही. पण, कोकणात आजपर्यंत मागासलेपण आहे. केंद्रसरकारी प्रकल्प असतो अथवा महाराष्ट्र शासनाचे त्यात कोकणातील विकास दिसत नाही.कोकणातील सौंदर्य नष्ट करणारे प्रकल्प अणुऊर्जा, रिफायनरी, बॉक्साईड, खेड येथे येणारा प्रकल्प हानीकारक आहेत म्हणून कोकणातील जनता विरोध करते. कोकणातील सौंदर्याला बाधा येणार नाहीत असे प्रकल्प आणावेत कोकणातील जनता तुमचे कौतुक करेल. कोकणातील मतदारांनी आपला भविष्यकाळ डोळ्यासमोर ठेवून मतदान करावे. तेव्हाच लोकप्रतिनिधींना कोकणची महती कळेल.

– **महादेव गोळवसकर**, मुंबई

दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय अग्निशमनदल दिन

दरवर्षी ४ मे हा दिवस फायर फायटर डे म्हणजेच आंतरराष्ट्रीय अग्निशमन दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश अग्निशमन दलाच्या जवानांचा सन्मान करणे आणि त्यांच्या कार्याबद्दल त्यांचे आभार मानणे हा आहे. रस्त्यावरून कान बसतील एवढ्या मोठ्याने सायरन, घंटी वाजवत जाणाऱ्या लाल रंगाच्या, भल्या मोठ्या अग्निशमन दलाच्या गाड्या पाहिल्या की आपणा सर्वांनाच धडकी भरते. कोठेतरी आग लागल्याची किंवा कोणीतरी संकटात असल्याची आपल्यासाठी ती खूण असते. आणि नकळत आपल्या तोंडून अग्निशमन दलाची मोहीम यशस्वी फत्ते होऊ दे म्हणून आपण देवाला प्रार्थना करतो. आगीत अडकलेल्या प्राणांचे जीव वाचविण्यासाठी अग्निशमन दलातील जवानांना अग्निदिव्य पार करावे लागते. अनेकदा आपले कर्तव्य बजावत असताना अग्निशमन दलातील जवानांना आपले प्राण गमवावे लागत असल्याच्या दुर्दैवी घटनाही घडतात. अशीच एक घटना ऑस्ट्रेलियात घडली. १९९८ साली ऑस्ट्रेलियातील लिन्हन येथे ही दुर्दैवी घटना घडली. येथील जंगलाला लागलेला भीषण वणवा विझविण्यासाठी गेलेल्या गिलोन्ग वेस्ट अग्निशमन दलाच्या ५ जवानांचा आगीत होरपळून जीव गेला. गॅरी व्रेदेवेल्दीत, ख्रिस इव्हान्स, स्टुअर्ट डेव्हिडसन, जेसन थॉमस आणि म्यॅथू आर्मस्ट्रॉंग या ५ जवानांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली होती. हे ५ जण असलेला अग्निशमन दलाचा ट्रक घटनास्थळी दाखल होताच वाऱ्याची दिशा बदलून ट्रक आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. या दुर्दैवी घटनेच्या स्मरणार्थ ऑस्ट्रेलियातील दि कंट्री फायर ऑथॉरिटी ऑफ व्हिक्टोरिया या अग्निशमन दलातील जे. जे. एडमंडसन यांनी आंतरराष्ट्रीय अग्निशमन दल दिनाचा पुकार केला. युरोपात अग्निरक्षकांचा आश्रयदाता म्हणून मानण्यात येणारा संत फ्लोरियन याच्या नावाने हा दिवस पाळण्यात येतो. अग्निशामक होण्याचा अर्थ काय आहे हे कोणीही मांडू शकले नसते! आपल्यापैकी बहुतेकजण आपल्या प्रियजनांसाठी-कुटुंबातील सदस्य, मित्र, पाळीव प्राणी यांच्यासाठी आपला जीव धोक्यात घालतील. पण ज्याला तुम्ही अजिबात ओळखत नाही अशा व्यक्तीसाठी गंभीर दुखापत किंवा मृत्यूचा धोका पत्करण्याची तुम्ही कल्पना करू शकता का? एखाद्या अनोळखी व्यक्तीची सुटका करण्यासाठी जळत्या इमारतीत जाण्याची तुम्ही कल्पना करू शकता, हे माहीत असूनही तुम्ही बाहेर येणार नाही?

एका निराधार प्राण्याला वाचवण्यासाठी जळत्या जंगलात झाडावर चढण्याची तुम्ही कल्पना करू शकता का, जो स्वतःहून खाली येण्यास घाबरलेला आहे? या अशा गोष्टी आहेत ज्या अग्निशामक दररोज करतात, आणि आम्ही कदाचित त्यांना वीरता म्हणून पाहतो, अग्निशामकांसाठी, त्या फक्त कामाचा एक भाग आहेत. या वीर पुरुष आणि स्त्रिया त्यांचे कार्य अगदी चतुराइने आणि धाडसाने करतात, म्हणून आपण सर्वांनी त्यांच्या सन्मानार्थ अग्निशामक दिन साजरा करण्याचे सुनिश्चित करूया!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**४ मे**

१) श्री. रमेश प्रभाकर जगे
अलिबाग, ४-५-१९५७

२) श्री. अनंत हरी पाटील
चेंढरे, ४-५-१९४६

३) श्री. नितीन मधुकर गुप्ते
वरसोली, अलिबाग
४-५-१९६३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

**आजचे अन्नदाते**

**कै. बाबासाहेब चौगुले, स्मृतिदिन, अलिबाग**



**मथुरा व हरिश्चंद्र बाळू नाखवा, स्मरणार्थ अलिबाग**

# गावागावात गोंधळाची परंपरा

## लग्नसराईत वाघ्या-मुरळीला मागणी; मानधनातही झाली वाढ

**| संगमेश्वर | प्रतिनिधी |**

हिंदू धर्मात विवाह समारंभ निर्विघ्नपणे पार पडावेत, यासाठी देवाला साकडे घालण्याची प्राचीन परंपरा आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कुलधर्म आणि कुलाचारासाठी 'जागरण-गोंधळ' घालण्याची प्रथा आजही तितक्याच श्रद्धेने जपली जात आहे. सध्या लग्नसराईचा हंगाम जोरात असल्याने घराघरांतून कुलदैवत खंडोबाच्या जागरणाचे आणि कुलदेवता तुळजाभवानीच्या गोंधळाचे स्वर घुमू लागले आहेत.

घरातील मुला-मुलीचे लग्न जमले किंवा देव्हाऱ्यातील देव जेजुरीला खंडोबाच्या भेटीला नेऊन आणले की, कुलाचार म्हणून जागरण-गोंधळ घातला जातो. पूर्वी या कार्यासाठी थेट जेजुरीहून वाघ्या-मुरळी येत असत. या विधीमध्ये खंडोबाची तळी भरणे, घटस्थापना आणि पहाटेच्या वेळी लोखंडी कडी असलेले साखळीचे लंगर तोडणे यांसारखे महत्त्वाचे विधी केले जातात.

लंगर तोडणे म्हणजे डोक्यावरील जबाबदारीचे ओझे उतरविणे, अशी यामागील धारणा आहे. मागणी वाढल्याने त्यांचे मानधनही वाढले आहे. ही परंपरा केवळ करमणूक नसून श्रद्धेचा भाग असल्याने यजमानही या सादरीकरणात तल्लीन होऊन जातात.



### अशी आहे ही परंपरा

रात्री दहाच्या सुमारास जागरणाला सुरुवात होते. कैलास राणा शिवचंद्र मौळी या शंकरस्तुतीने कार्यक्रमाचा प्रारंभ होतो. यामध्ये गण-गौळण, मल्हारी कथन आणि खंडोबा-म्हाळसा-बाणाई यांच्या नाट्यरूपी कथा सादर केल्या जातात. देवाचे लग्न आणि विरह प्रसंग वाघ्या-मुरळी आपल्या गायन व नृत्यातून उभा करतात. पौराणिक कथांचेही सादरीकरण केले जाते.

> **लग्नसराईचा हा हंगाम आमच्यासाठी उपजीविकेचे मुख्य साधन असतो. श्रद्धेपोटी जागरण-गोंधळ घालणारे आणि कलेसाठी रात्रभर घाम गाळणारे लोककलावंत आता मोजकेच राहिले आहेत, तरीही आम्ही ही परंपरा टिकवून आहोत.**
> **- सुरेश तावडे, गोंधळी**

> **जागरण-गोंधळ ही महाराष्ट्राची समृद्ध लोककला आहे. काळानुसार तिचे स्वरूप बदलले असले तरी त्यामागची भावना आजही मूळ आहे. आपली संस्कृती पिढ्यान्पिढ्या समृद्ध राहण्यासाठी या लोककलावंतांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे.**
> **- रवींद्र यादव, अभ्यासक**

## भारताच्या संविधानाच्या प्रती भेट

**| महाड | प्रतिनिधी |**

सामाजिक बांधिलकी जपत व्हिजन सेल्स महाडचे निलेश यादव व त्यांचे बंधु सुबोध यादव यांनी आपले बंधु अभिजीत यादव यांच्या स्मरणार्थ एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्मित भारताच्या संविधानाच्या पाच प्रती करवा वाचनालय महाड येथे सुपूर्त केल्या. हा कार्यक्रम डॉ. चेतन सुर्वे यांच्या हस्ते पार पडला.



यावेळी करवा वाचनालयाचे कार्यवाहक राकेश दोशी उपस्थित होते. या उपक्रमामुळे वाचनालयात येणाऱ्या वाचकांना संविधानाचा अभ्यास करण्यासाठी मोठी मदत होणार असून, संविधानाबद्दल जागरूकता वाढीस लागणार आहे. यादव बंधूंच्या या उपक्रमाचे महाड परिसरात कौतुक करण्यात येत आहे.

## शिवशांती स्नेहालयातर्फे आरोग्य शिबीर

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्र, अलिबाग यांच्या वतीने श्रीबाग येथील श्रीमती भारती दीनानाथ तरे सभागृहात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिवशांती स्नेहालयाचे अध्यक्ष डॉ. सुभाष म्हात्रे, डॉ. किरण नाबर, डॉ. शुभदा कुरतचकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिराच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. सुभाष म्हात्रे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले, तर डॉ. अनिल डोंगरे यांनी उपस्थितांचा परिचय करून दिला.



डॉ. डोंगरे यांनी वाढत्या वयानुसार शरीरात होणारे बदल स्वीकारताना ज्येष्ठ नागरिकांनी सतर्क राहणे किती महत्त्वाचे आहे, हे सांगितले. या शिबिराप्रसंगी डॉ. प्रतिभा म्हात्रे, प्रफुल्ल राऊत, डॉ. जगदीश थळ, डॉ. सुरेश म्हात्रे, ॲड. मनोज पडते, शरद कोरडे, चारुशिला कोरडे, उमाजी केळुसकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## डायमंड स्पिरीटचा वर्धापन दिन

**पनवेल :** चांगला आहार हेच माणसाच्या आयुष्यातील उत्तम औषध आहे असे प्रतिपादन आहारतज्ञ डॉ.स्वप्नील वाघ यांनी डायमंड स्पिरीट फाऊंडेशनच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या समारंभात केले. डायमंड स्पिरीट फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त पनवेलच्या शांतिवनातील कुष्ठरोग निवारण समितीच्या सभागृहामध्ये आयोजित केलेल्या समारंभासाठी कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, रमेश भुकन, नंदकिशोर उरणकर, नीलकांत कोळी, ज्ञानेश्वर धनावडे, नम्रता धनावडे भुकन, उज्वला राले, अलका आव्हाड, सौजन्य पास्ते,आदिती उपासनी, शोभा ठोंबरे, कल्पना पाटील आदी उपस्थित होत्या.

## चवदार तळ्यात ११ विहिरींचे दर्शन

**| महाड | प्रतिनिधी |**

पाण्याच्या निमित्ताने समतेचा मूलभूत हक्क मिळवून देण्यासाठी चवदार तळ्यावर संघर्ष झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ठिकाणी सत्याग्रह करून समतेचा संदेश दिला. या तळ्याच्या जलशुद्धीकरणासाठी गाळ काढण्याचे काम सुरू झाले असून, तळ्यातील ११ विहिरींचा ठेवा पुन्हा दिसू लागला आहे. या ऐतिहासिक तळ्याचे अंतरंग पाहण्यासाठी अनेक जण गर्दी करीत आहेत.

समाजातील अस्पृश्यतेचे जोखड झुगारून समता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ ला चवदार तळे येथे सत्याग्रह केला. त्यामुळे हे ठिकाण लाखो नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे ऐतिहासिक स्थळ ठरले. २०२१ जुलैला महाडमध्ये महापूर आला. त्या वेळी या तळ्यात मोठ्या प्रमाणात गाळ आणि कचराही शिरला. तो काढण्यासाठी पालिकेने तळ्यातील संपूर्ण पाणीउपसा करून ते स्वच्छ केले. त्या वेळीही तळ्यातील ११ विहिरींचे दर्शन झाले. हे पाणी उन्हाळ्यात आटून जात असे. अशा वेळी तळ्यामध्ये डबरे खोदून पाणी काढण्यात येत होते. अशा प्रकारचे १४ डबरे तळ्यात तयार झालेले आहेत.



> **ऐतिहासिक चवदार तळ्यातील पाणी शुद्धीकरणाकरिता पाणीउपसा पूर्ण झाला असून, गाळ काढण्याचे काम सुरू आहे. या तलावातील ११ विहिरींमधील गाळ काढला आहे.**
> **- धनंजय कोळेकर, मुख्याधिकारी, महाड नगर परिषद.**

## कामगार दिनानानिमित्त श्रमविरांचा सन्मान

**| पनवेल | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त विविध क्षेत्रांतील कामगारांचा सत्कार करून त्यांच्या योगदानाचा सन्मान पत्रकार मित्र असोसिएशन संस्थेतर्फे करण्यात आला. यामध्ये औद्योगिक कामगार, कचरा वेचक, सुरक्षारक्षक आणि घरेलू कामगार, गॅस सिलेंडर वाहक यांसारख्या लहान-मोठ्या क्षेत्रातील कामगारांचा पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे कामगार दिनाचे औचित्य साधून सन्मान करण्यात आला होता.

कामगार क्षेत्रातील अनेक कामगार नेते तसेच कामगारांसाठी आयुष्यभर झटणाऱ्या नामांकित मंडळींना श्रमवीर सन्मान पुरस्कार देऊन त्यांचा यथाशक्तीप्रमाणे गौरव करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व चर्मकार तसेच गटई कामगारांसाठी आपले आयुष्य खर्ची घालणारे शिवदास कांबळे यांनी आपल्या कार्याचा आलेख भाषण करताना मांडला व कामगार दिनाचे महत्व संगितले.



सदर कार्यक्रमास शिवदास कांबळे, अनिल जाधव, प्रियांका गाडे, वैभव ढवळे, डॉ. पल्लवी पाटील, विजया कदम, डॉ. श्रुणाल जाधव, केवल महाडिक, नितीन जोशी, प्रवीण शेंडे, राजन शेलार, उपस्थित होते.

## कविता काळे यांचा सन्मान

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

बालविवाह रोखल्याप्रकरणी ग्रामसेविका कविता सुरेश काळे यांचा महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून मंत्री अदिती तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. चिखले येथे कार्यरत असलेल्या ग्रामसेविका कविता काळे यांनी सामाजिक जबाबदारी पार पडत बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अंतर्गत मिळालेल्या अधिकाराचा वापर करून बालविवाह यशस्वीरित्या रोखला. बालविवाह सारख्या अनिष्ट प्रथेला पायबंद घालून अल्पवयीन बालकांचे आरोग्य, शिक्षण आणि भविष्य सुरक्षित करण्याच्या कार्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. या कामगिरीबद्दल काळे यांना अलिबाग येथे झालेल्या कार्यक्रमात गौरवण्यात आले.



## 'नॅशनल बर्न्स सेंटर'चे त्वचादानाचे आवाहन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

नॅशनल बर्न्स सेंटरने व संपूर्ण भारतात त्वचादानाच्या गंभीर तुटवड्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. अधिक लोकांनी त्वचादानासाठी पुढे यावे या उद्देशाने नॅशनल बर्न्स सेंटरने हाती घेतलेल्या मोहिमेचे नेतृत्व संचालक आणि प्लास्टिक सर्जन डॉ. सुनील केसवानी यांनी केले आहे.त्वचादानाविषयीच्या जागृतीचा अभाव हेच या तफावतीचे मुख्य कारण आहे. मुंबईतील स्किन बँक्सना दरमहा आवश्यक असलेल्या त्वचादानापैकी केवळ २५ टक्केच दान प्राप्त होते.



भाजल्यामुळे जखमी झालेल्या रुग्णांपैकी सुमारे ७० टक्के रुग्ण १५ ते ३५ या वयोगटातील असतात त्वचारोपणाची सुविधा सहज उपलब्ध नसल्यामुळे, भाजल्यातून बचावलेल्या रुग्णावर तसेच त्यांच्या कुटुंबावर मोठा आर्थिक आणि मानसिक ताण पडतो. त्वचेच्या रोपणाची सुविधा वेळेवर उपलब्ध झाल्यास, भाजलेल्या रुग्णांवर उपचारांच्या सर्वात नाजूक आणि निर्णायक टप्प्यातच योग्स ते पुनर्वसन करता येते; ज्यामुळे गुंतागुंत निर्माण होण्याचा आणि मृत्यूचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. मृत्यूनंतर ६ तासांच्या आत त्वचेचे दान करता येते; मात्र त्वचेचे दान करण्यासाठी, मृत व्यक्तीची स्थानिक त्वचा बँकेमध्ये नोंदणी झालेली असणे आवश्यक असल्याचे सांगितले.

या जनजागृती उपक्रमाला रोटरी क्लब ऑफ बॉम्बे नॉर्थ आणि रोटरी क्लब ऑफ देवनार यांनी पाठिंबा दिला. या मंचाला झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर, सुमती ग्रुप यांसारख्या संस्थांकडून सहकार्य मिळाले आहे.

**विविध भाजीपाल्यांची रोपे वितरित** **नाविन्यपूर्ण प्रयोगामुळे मिळणार सकस आहार**

# किचन गार्डन उपक्रमाचा शुभारंभ

**| नेरळ | प्रतिनिधी |**

युनायटेड वे मुंबई, अंधेरी (प.) संस्थेद्वारे कार्यान्वित 'जल संजीवनी' प्रकल्प कर्जत तालुक्यात मृदा व जलसंधारण, ग्रामीण विकास, शाश्वत शेती आणि पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. याच प्रकल्पाचा एक भाग म्हणून, पाथरज ग्रामपंचायतीमधील डोंगरपाडा येथे गावकऱ्यांना विशेषतः महिलांना पोषणयुक्त सेंद्रिय भाजीपाला उत्पादनासाठी प्रोत्साहित करण्यासाठी उभी परसबाग आणि महिला सक्षमीकरणासाठी रोपवाटिका व्यवसायाचे औपचारिक उद्घाटन डोंगरपाडा गावात करण्यात आले. यावेळी कृषी पर्यवेक्षक अनिल रूपनवर, भाणवसे, स्वाती अवरगंडे, मंगेश बोपचे आदी उपस्थित होते.



कमी पाणी आणि कमी श्रमात घराच्या घरी विषमुक्त भाजीपाला पिकवता यावा, या उद्देशाने डोंगरपाडा गावातील २७ महिला बचत गट सदस्य असणाऱ्या कुटुंबांना या उपक्रमात प्राधान्य देण्यात आले आहे. या कुटुंबांना निम पेंड, ट्रायकोडर्मा, उसाची मळी यांसारखी सेंद्रिय खते तसेच विविध भाजीपाल्यांचे बियाणे किट आणि रोपे वितरित करण्यात आली होती. या कार्यक्रमात सध्या या भाजीपाल्याची उगवण उत्तम झाली असून या नाविन्यपूर्ण प्रयोगामुळे महिलांना घरच्या घरी सकस आहार उपलब्ध होणार आहे. या किचन गार्डन उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

त्यावेळी खांडस बचत गटाच्या अरुणा ऐनकर यांनी आपल्या गटाची भरभराट कशी झाली याबद्दल माहिती दिली. डोंगरपाडाचे अतुल लोहकरे यांनी संस्थेने आतापर्यंत केलेल्या मृदा आणि जलसंधारण कार्याची माहिती दिली. तुंगी येथील ग्रामस्थ काळूराम पारधी यांनी संस्थेने तुंगी गावात राबवीत असलेल्या कार्याची सविस्तर माहिती देऊन असेच लोक उपयोगी कार्य निरंतर सुरु असावे अशी अपेक्षा व्यक्त केली. महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी अनिल रूपनवर यांनी उपस्थितांना रासायनिक शेतीचे दुष्परिणाम तसेच सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून दिले.

> **महिला बचत गटांना कृषीविभागद्वारे मार्गदर्शन करून कलम बांधणीपासून ते मार्केटिंग तसेच शासकीय लायसन्स मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून देणार आहे.**
> **-नितीन भानवसे सहाय्यक कृषी अधिकारी**

## निवडक



### वाघ्रण ग्रामपंचायतीत महाराष्ट्र दिन साजरा

**वाघ्रण :** अलिबाग तालुक्यातील वाघ्रणमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन विविध कार्यक्रमानी साजरा झाला. सकाळी प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत कार्यालया समोर झेंडावंदन करण्यात आले. तसेच अनिल रमाकांत पाटील वाचनालयाचा २१ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. दिपक पाटील यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. या कार्यक्रमात वाघ्रण शाळेतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच वाघ्रण गावचे रहिवासी ॲड. सन्मान पाटील न्यायाधीश परीक्षा उत्तीर्ण झाल्या बद्दल तसेच रोहीत पाटील वेट लिफ्टिंगमध्ये सुवर्णपदक प्राप्त केल्या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उदय पाटील यांनी केले. तर ॲड. प्रमोद पाटील, शिल्पकार पाटील, रोशनी म्हात्रे आदीनी मनोगत व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष उदय पाटील सरपंच राजेंद्र पाटील, ब्रम्हानंद पाटील, गणेश पाटील, प्रमोद पाटील, तुकाराम पाटील, सुजाना गुंजाळ, ललीता पाटील, शुभदा पाटील, स्वागत पाटील, विवेक पाटील, दयानंद म्हात्रे, छाया पाटील, ललीता पाटील, विजया पाटील, सारीका पाटील, संजिवनी पाटील, विणा धोदरे, सोनाली पाटील आदी उपस्थित होते.




### प्राचार्य डॉ. ए. आर. पाटील सेवानिवृत्त

**रसायनी :** महाराष्ट्र शासनाचा जिल्हा व राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. अनिल पाटील यांचा जीवन कला मंडळ रसायनी व डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातर्फे सेवानिवृत्ती सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. आपल्या ३० वर्षाच्या प्रदिर्घ सेवेत त्यांनी आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आपल्या संस्थेचा व शाळेचा परिसरात नावलौकिक निर्माण केला. जीवन कला मंडळ रसायनी या संस्थेने दखल घेऊन सन २०१३ पासून त्यांची मंडळावर कोषाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. या संधीचे सोने करून त्यांनी अध्यापनाबरोबर संस्थेच्या माध्यमातून परिसरातील एस. एच. केळकर, बिर्ला कार्बन, अल्केल अमाईनस व नोहोझाईम कंपनीच्या सामाजिक विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आपल्या शाळेत वर्ग खोल्या, प्रयोगशाळा बांधकाम संगणक लॅब व भौतिकसुविधा तयार केल्या. या सोहळ्यास जीवन कला मंडळ रसायनी अध्यक्ष तुलसीदास पाटील, अनंता दळवी, मोहन मालकर, बाळासाहेब पाटील, डॉ. भाउसाहेब पाटील, जैनेंद्र बोरसे, भानुदास बोरसे, प्रारब्ध पवार, युवराज सुर्यवंशी, प्रा.गणेश सोनवणे, माजी मुख्याध्यापक काळे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रल्हाद माळी यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. बी. आर. पाटील यांनी केले होते.

### धनगरमलाई-दांडगुरी रस्ता जीवघेणा

**म्हसळा :** म्हसळापासून धनगरमलई मार्गे बोर्लीपंचन, दिवेआगर, श्रीवर्धन जाणाऱ्या रस्त्याची अक्षरशः चाळन झाली असून रिक्षा आणि दोन चाकी वाहनांचा आणि वाहन चालकांच्या जीवावरचा खेळ झाला आहे. याच मार्गांवर वागेश्वरी हे नवसाला पावणारे देवस्थान असून दरवर्षी मार्च एप्रिल दरम्यान वागेश्वरी येथे फार मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. मुंबई-पुण्याहून मोठ्या प्रमाणात भाविक यात्रेसाठी येत असतात. त्या भाविकांचे मुख्य वाहन म्हणजे रिक्षा, परंतु, रस्त्याची अवस्था पाहिली तर सहजा सहजी रिक्षावाला जाण्यास तयार होतं नाही. धनगरमलई पर्यंत ५ कि. मी. रस्त्याची दुरावस्था इतकी वाईट आहे कि या रस्त्यावरून रिक्षाचं काय पण धड चालणेही अवघड झाले आहे. या मार्गांवर ८ ते १० लहान मोठी गावे व वाड्या आहेत. यांचे बाजारहाट साठी मुख्य ठिकाण म्हसळा असून एस. टी. दिवसातून एखाद दुसरी फेरी होते त्यामुळे खाजगी वाहनानशिवाय दुसरा पर्याय नाही. या रस्त्यावरून वरवटणेकोंड, साळविंडे, देवळाची वाडी, बागाची वाडी, कासारकोंड, धनगरमलई, देवखोल (श्री शंकराचे पुरातन आणि स्वयंभू देवस्थान),आणि पुढे श्रीवर्धनला आणि दिवेआगर असा हा रस्ता जोडला गेला आहे. तसेच नागरिकांना भाड्या साठी जास्त पैसे मोजावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये त्रिव नाराजी निर्माण झाली. यासाठी ग्रामस्थानी अनेकवेळा निवेदनेही दिली असल्याचे अशोक अधिकारी, सुदर्शन जंगम, रमेश भुवड, प्रदीप पारदुले, श्रीकांत जंगम, दीपक जोशी, नातूराम सातम आदी स्थानिक मंडळींनी सांगितले.





### ललिता पार्टे यांचा सत्कार

**खांब :** रोहे तालुक्यातील सहयोग अपंग कल्याणकारी संस्था दिव्यागांचे हक्क व न्यायासाठी राज्य घटनेने दिलेल्या लोकशाही मार्गाने सातत्याने झगडणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून रोहा नगर परिषदेच्या कार्यालयामधील अपंग कल्याण विभागाच्या अधिकारी ललिता पार्टे नियत वयोमानानुसार ५८ व्या वर्षी ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्ती झाला. त्यांचे कृतज्ञतापूर्वक प्रेमाने सेवानिवृत्ती सेवापूर्ती निरोप समारंभ संस्थेचे अध्यक्ष राजेश कांबळे, उपाध्यक्ष नंदलाल गुप्ता, सेक्रेटरी रमेश खराडे यांच्या हस्ते शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला यावेळी सहसचिव अमित सोनी, कोषाध्यक्ष संजय टी. टी. सल्लागार किरण मोहिते, सहकोषाध्यक्ष निवृत्ती सुर्वे, सदस्या जयश्री पुजारी, वैशाली विठ्ठल पवार, गणेश जंगम, संजय आर्ते, अनिल पाटील, नारायण कदम, शैला धनावडे, रेश्मा भोईर, राजेंद्र किंजरे, सिद्धेश नारायण कदम, अद्वित देशमुख, अनिता मांडुसकर आदी उपस्थित होते.

### शोभा खांडेकर यांना पुरस्कार प्रदान

**कोलाड :** रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा धानकान्हे आदिवासीवाडी येथील उच्च शिक्षित व होतकरू शिक्षिका शोभा अलंकार खांडेकर यांना शुक्रवारी (दि.१) मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. खांडेकर यांनी अल्पवधी काळात अतिशय प्रेरणादायी प्रवास आहे. घर संसार सांभाळत आपल्या करिअरला दिशा दिली व एक आदर्श शिक्षक कसे असावा हे आपल्या कामातून सिद्ध केले यामुळे त्यांना भारत न्यूज नेटवर्कच्यातर्फे भारत सन्मान अवार्ड २०२६ आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## निवडक

### ‘अनगड मोती’ पुस्तकाचे प्रकाशन



**महाड :** महाड येथील ज्येष्ठ साहित्यिक व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त माजी शिक्षक प्रभाकर भुस्कुटे यांच्या ‘अनगड मोती’ या पुस्तकाचे प्रकाशन मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते पार पडले. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून संकल्प प्रतिष्ठान महाडच्या वतीने आणि हिरवळ प्रतिष्ठान, कोमसाप महाड, रंगसुगंध, होप फाऊंडेशनांच्या सहकार्याने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथील बहुउद्देशीय सभागृहात सायंकाळी हा सोहळा पार पडला. या सोहळ्यास पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर, सुनील कविस्कर, हिरवळ प्रतिष्ठानचे किशोर धारिया, संजय भुस्कुटे, शोभा सावंत, संदीप जाधव, सुमित पवार, सतीशचंद्र टिपणीस, गंगाधर साळवी, नरेंद्र महाडिक, प्रदीप शेठ आदी मान्यवर उपस्थित होते. ङ्गअनगड मोतीफ हे भुस्कुटे गुरुजींचे ३६ वे पुस्तक असून त्यांनी याआधी महाडच्या दुर्मिळ इतिहासावर तसेच अनेक थोर व्यक्तींवर लेखन केले आहे. या पुस्तकामध्ये महाड तालुक्यातील विस्मृतीत गेलेल्या, मात्र समाजकार्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या २७ अपरिचित व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा वेध घेण्यात आला आहे.

### पुष्पा रामाने पोलीस दलात दाखल

**तळा :** जिद्द, चिकाटी आणि अपार कष्ट करण्याची तयारी असल्यास आपल्याला यशाला नक्कीच गवसणी घालता येते. तळा शहरातील पुष्पा रामाने हिने अशाच प्रकारे कठोर मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर पोलीस दलात दाखल होत आपले पोलीस होण्याचे स्वप्न साकार केले आहे.अतिशय दुर्गम व डोंगराळ भागात वसलेल्या तळा तालुक्यातील शहरी भागात वाढलेल्या पुष्पाने आपण पोलिसात भरती व्हावं हे स्वप्न उराशी बाळगले होते. त्या दृष्टीने तिने तयारीही सुरू केली होती. पुष्पाचे वडील बाळकृष्ण व आई रेश्मा यांनी अपार कष्ट करून आपल्या मुलीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी लागणारे आर्थिक भांडवल पुरवले.आपल्या आई वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेऊन पुष्पाने मन लावून पोलीस भरतीची तयारी सुरू केली. आपल्या प्रचंड मेहनतीच्या बळावर पुष्पाने ११ एप्रिल रोजी पोलीस भरतीची परीक्षा दिली. तिने घेतलेले अपार कष्ट व मेहनतीमुळे २ मे रोजी लागलेल्या निकालात ती मीरा भाईंदर जिल्ह्यात आठव्या क्रमांकात येऊन पोलीस दलात भरती झाली. पोलीस होण्याचे उराशी बाळगलेले स्वप्न पुष्पाने आपल्या जिद्द व मेहनतीच्या जोरावर पूर्ण करून पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मुलींसमोर आदर्श निर्माण केले आहे.मीरा भाईंदर पोलीस दलात दाखल झाल्याने पुष्पा रामाने हिचे तालुक्यासह शहरातील ग्रामस्थ, महाविद्यालय तसेच नातेवाईकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.



### कर्नाळा बर्ड अभयआरण्यात प्राणी गणना

**पनवेल :** मुंबई-गोवा महामार्गावर पनवेल पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कर्नाळा पक्षी अभय आरण्यात विविध प्रजातीच्या वृक्षासोबत पशु पक्षांचे वास्तव्य आहे. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी देश भरातील अभय आरण्यातील प्राण्यांची गणना केली जात असल्याने कर्नाळा पक्षी अभय आरण्यात देखील वन विभागाचे अधिकारी आणि वन्यजीव प्रेमींच्या मदतीने प्राणी गणना करण्यात येणार आहे. वैशाख शुक्ल पौर्णिमा म्हणजेच बुद्ध पौर्णिमा ही उन्हाळ्याच्या दिवसातील सर्वाधिक प्रकाशमान रात्र असते.



वैशाख महिन्यात उन्हाच्या झळा तीव्र असतात. त्यामुळे अरण्यातील प्राणी पाणी पिण्यासाठी हमखास पाणवठ्यावर येत असतात.यानिमित्त कर्नाळा बर्ड सँक्च्युरी येथे वन विभागाच्या वतीने प्राणी गणना मोहिम उत्साहात पार पडली. मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या या अभयारण्यात पहाटेपासूनच विविध ठिकाणी मचान उभारून आणि ट्रॅप कॅमेऱ्यांच्या साहाय्याने प्राण्यांची नोंद करण्यात आली. या गणनेत वन अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था तसेच स्थानिक सर्पमित्रांचा सक्रिय सहभाग होता. या कार्यक्रमाकरीता अभयाराण्यात तीन ठिकाणी पाणवठ्यावर मंचान तयार करण्यात आले होते. या ठिकाणी येणाऱ्या प्राण्यांचे फोटो कॅमेरात कैद करुन आणि पाऊलखुणांवरुन प्राण्यांच्या संख्येची गणना करण्यात येत असते. निसर्ग अनुभवाचा हा दिवस प्राणीप्रेमी आणि निसर्ग अभ्यासकांसाठी पर्वणीचा दिवस ठरत असल्याने देशभरातील अरण्यात आयोजित कार्यक्रमात असंख्य प्राणीप्रेमी आणि अभ्यासक भाग घेतला. जंगलातील जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी ही गणना अत्यंत महत्त्वाची मानली जाते. माकडे, ससे, हरिण यांसह विविध पक्ष्यांची संख्या नोंदविण्यात आली असून काही दुर्मिळ प्रजातींचेही दर्शन घडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यावेळी जंगल संवर्धन, वन्यजीवांचे संरक्षण आणि पर्यावरण संतुलन याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच नागरिकांनी जंगल परिसरात प्लास्टिक टाकू नये, प्राण्यांना त्रास देऊ नये असे आवाहन करण्यात आले.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **नागाव येथे राहून कामासाठी कपलची आवश्यकता** कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम करणे, तसेच गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल करणे. सुविधा : राहण्यासाठी स्वतंत्र केअरटेकर रूम उपलब्ध. पगार : रू. २५,०००/- प्रति महिना संपर्क : ७५५९१८४६१२
- **वधू पाहिजे-** केंद्रीय सरकारी अधिकारी वय ४० ते ५०, निमगोरी शिक्षण-ग्रज्युकेशन , जात -हिंदु. उत्पन्न- २०००००० वार्षिक, फोन - ७३८५६६४०७९.
- **भारतीय उद्योजकता विकास संस्था** (EDII) अहमदाबाद यांना अलिबाग येथे मध्यवर्ती ठिकाणी कार्यालयाकरीता जागा पाहिजे. तसेच ग्राफीक्स डिझायनर पाहिजे. संपर्क - ७७७५८०२४९७.
- **पेझारी बांधण येथील नवनिर्माण** विद्यालयासाठी स्कुल ऑरगनाझर कम कॉन्सीलर तसेच BA/B.Sc./B.Ed शिक्षिका पाहिजेत व अकौटन्स क्लार्क पाहिजेत. आपला बायोडाटा 8169604575 या नंबरवर व्हॉटसअप करा.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# मेंढपाळांना आता परतीचे वेध

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

**राज्यातील दुष्काळी व निमदुष्काळी भागातील मेंढपाळ, विशेषतः धनगर समाज, पोटाची खळगी भरण्यासाठी दरवर्षी आपला कुटुंबकबिला आणि शेळ्या-मेंढ्यांसह शेकडो किलोमीटरचा प्रवास करून कोकणात, विशेषतः रायगड जिल्ह्यात दाखल होतो. मात्र, रणरणता उष्मा, पाण्याची टंचाई आणि अवकाळी पावसाचा फटक्यामुळे या मेंढपाळांची मोठी वाताहत होते. आता पावसाळा जवळ येत असल्याने या मेंढपाळांना आपल्या मूळ गावी परतण्याचे वेध लागले असून, त्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. पाली-सुधागड व जिल्ह्यातील अनेक भागात मेंढपाळ स्थिरावले होते.**



- **पोटाची खळगी भरण्यासाठी पायपीट**
- **वाढता उष्मा चारा पाण्याचं संकट**

मेंढपाळ घोडे किंवा खच्चरावर आपला लवाजमा, राखणदार कुत्रा आणि मेंढ्या घेऊन रायगडच्या माळरानावर दाखल होतात. कडक उन्हात उघड्यावर कापडी तंबू ठोकून त्यांचा संसार थाटला जातो. रायगडमध्ये पावसाळी भातशेती कापल्यानंतर जमीन पडीक असते, अशा जागी हे मेंढपाळ मुक्काम करतात. या बदल्यात मेंढ्यांच्या लेंडीपासून जमिनीला नैसर्गिक खत मिळत असल्याने शेतकरीही त्यांना आनंदाने जागा देतात. मात्र, हा प्रवास दिसतो तितका सोपा नाही. ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता दिवस-रात्र मेंढ्यांच्या कळपात राहून त्यांना हा व्यवसाय करावा लागत आहे.

सततच्या स्थलांतरामुळे मेंढपाळांच्या मुलांना शाळा गाठता येत नाही. एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात भटकंती होत असल्याने या मुलांचे ज्ञानकण गिरवण्याचे वय मेंढ्या राखण्यातच जाते. रणरणत्या उन्हात भटकंती करताना शुद्ध पाणी आणि सकस अन्न मिळत नाही. स्थानिक सरकारी दवाखान्यांवरच त्यांना अवलंबून राहावे लागते. दूरवर असल्याने मदतीला नातेवाईकही धावून येऊ शकत नाहीत. हा व्यवसाय पारंपरिक पद्धतीने चालतो. त्यामुळे मेंढ्यांचा विमा उतरवला जात नाही. रोगराई किंवा हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यात मेंढी दगावल्यास मेंढपाळाचे मोठे आर्थिक नुकसान होते.

**शहरीकरणाचा फास**

जिल्ह्यात वाढत चाललेले औद्योगीकरण आणि शहरीकरण यामुळे कृषी क्षेत्र आणि गायरान जमिनी कमी होत आहेत. परिणामी, मेंढपाळांना चारा आणि पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. जागाच उरली नाही तर मेंढ्या चरायच्या कुठे? असा प्रश्न आता या मेंढपाळांसमोर उभा ठाकला आहे.

### एसटी बस चालकाला मारहाण

**नवीन पनवेल :** आसुडगाव जवळ कार बसला आडवी लावून चालकाला शिवीगाळ आणि मारहाण केल्याप्रकरणी तीन अनोळखी ईसमाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात ३० एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अविनाश वाडेकर हे एसटी महामंडळात चालक म्हणून काम करतात. ३० एप्रिल रोजी बोरीवली डेपोतून बस घेऊन पुण्यासाठी निघाले. पनवेल रोडवर कळंबोली ब्रिजच्या पुढे आसुडगाव येथील पेट्रोल पंपाजवळ समोर आले असता पांढऱ्या रंगाची ब्रिजाकार क्रमांक एम एच ४८ डीडी ५८८७ वरील चालकाने त्याची कार बसच्या पुढे आणून आडवी लावली. त्यानंतर कारमधील तीन इसम खाली उतरले आणि चालकाच्या केबिनमध्ये येऊन माझ्या गाडीला ठोकले असे वाद घालून शिवीगाळ करुन मारहाण केली. यावेळी वाहकाने चित्रीकरण केले असता तिन्ही व्यक्तींनी त्याला देखील मारहाण केली. आणि मोबाईल फोडून कुठेतरी फेकून दिला. भांडण सोडवण्यासाठी प्रवासी आले असता त्यांनाही एकाने धक्का-बुक्की करुन ते निघून गेले.

## रोह्यात ‘पढाई से दोस्ती’ उपक्रम

**। खांब । प्रतिनिधी ।**

ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे व ग्लोबल इंडिया प्रा.लि.यांच्या संयु विद्यमाने आणि श्री विवेकानंद रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, रोहा यांच्या स्थानिक सहकार्याने ‘पढाई से दोस्ती’ हा उपक्रम रोहा तालुक्यात यशस्वीपणे राबवण्यात आला. तालुक्यातील तळाघर, किल्ला, धाटाव, वरसे, सानेगाव या खेडे गावात पढाई से दोस्ती हा उपक्रम गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने राबविण्यात आला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश मुलांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे, त्यांचे वाचन, लेखन, श्रवण आणि बोलण्याचे कौशल्य विकसित करणे असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



या शिबीरा प्रसंगी रामचंद्र म्हात्रे, डॉ. स्वप्नाली पाटील, राजू कुलकर्णी, निलेश पडवळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच पुण्यातील प्रख्यात ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे ओंकार बाणाईत, प्रकाश रणानवरे, अविनाश काठवटे, सुरेखा नाटेकर यांनी शिबिराला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमात श्री विवेकानंद रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट रोह्यमधील रिटा कशवालिया, प्रसाद भोईर, प्रसाद दगडे, किशोर तावडे यांचा सहभाग लाभला. या शिबिरात वरसे, देवकान्हे, उडदवणे, मुठवली, तळाघर, किल्ला, वाशी, धाटाव आणि खैरवाडी येथील सुमारे १२० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या शिबिराचे नियोजन पूजा जाधव, संपदा शिर्के, स्वप्नाली आकलेकर, तेजल नवशे आणि सानिका मोरे यांनी केले होते.

## जीवनधारा संस्थेचे उन्हाळी शिबीर उत्साहात

**। खांब । प्रतिनिधी ।**

जीवनधारा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्विस कोलाड येथे दि.२५ ते ३० एप्रिलपर्यंत पाच दिवसांचे उन्हाळी शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. एडुएल दी प्रोजेक्ट व जीवनधारा यांच्या संयुक्त विद्यमानाने पाच दिवसीय समर कॅम्प आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी ३६ वाड्यांमधून सुमारे शेकडो मुलांनी महत्वपूर्ण उपस्थिती नोंदवून विविध उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने केली व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले होते.

मुलांचे व मान्यवरांचे शब्द सुमनांनी स्वागत करण्यात आले. या पाच दिवसांमध्ये मुलांना सोबत वेगवेगळ्या प्रकारचे



उपक्रम राबविण्यात आले. पाच दिवसीय उन्हाळी शिबिरामध्ये सकाळच्या सत्रांमध्ये इंटेनशिव लैंग्वेज कन्सेप्ट, दुपारनंतर क्रोशे पेंटिंग, क्ले फ्लॉवर आर्ट्स, आर्ट्स प्ले, डान्स थेरेपी, स्पोर्ट्स डे, मेहंदी, प्लेस गेम्स, फिल्म इंग्लिश व गणित आदी विषय घेण्यात आले होते.

मुलांनी पाच दिवसात विविध उपक्रमात सहभाग नोंदवून आनंद लुटून व नवीन नवीन गोष्टी शिकून आत्मसात केल्या. शिबिराचे शेवटच्या दिवशी विविध उपक्रमात यशस्वी ठरलेल्या मुलांना बक्षीसे देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच सर्व मुलांनी नाश्ता व जेवणाचा आनंद लुटला अशा प्रकारे पाच दिवसीय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये समर कॅम्प हा कार्यक्रम पार पाडण्यात आला. या शिबिराचे यशस्वीतेसाठी जीवनधारा संस्थेच्या सर्व कार्यकर्ते मंडळी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## आठवडा बाजारामुळे वाहतूक कोंडी



**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील करंजाडे ग्रामपंचायत हद्दीत दर बुधवारी भरवला जाणारा बेकायदा आठवडा बाजार सध्या नागरिकांच्या डोकेदुखीचा विषय ठरत आहे. प्रत्येक आठवड्याला हेच चित्र दिसत असून रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असल्याने वाहतुकीची गंभीर कोंडी निर्माण होते.

बाजाराच्या दिवशी मुख्य रस्ते, चौक आणि गल्लीबोळ व्यापाऱ्यांनी व्यापलेले असतात. फळे, भाजीपाला, कपडे व इतर वस्तू विक्रीसाठी विक्रेते रस्त्याच्या दुतर्फा बसत असल्याने वाहनांसाठी मार्ग अत्यंत अरुंद होतो. परिणामी वाहतूक संथ गतीने चालते, तर काही ठिकाणी पूर्णपणे ठप्पही होते.

या कोंडीमुळे नागरिक आणि आपत्कालीन सेवांनाही मोठा फटका बसतो. विशेषतः रुग्णवाहिका व अग्निशमन दलाच्या वाहनांना मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागतो. स्थानिक रहिवाशांनी अनेक वेळा तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही ठोस बदल झालेला दिसत नाही.

वाहनचालकांच्या मते, बाजारासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. दर बुधवारी आम्हाला प्रचंड ट्रॅफिकचा सामना करावा लागतो. काही वेळा १०-१५ मिनिटांचा प्रवास तासभरात पूर्ण होतो, अशी प्रतिक्रिया एका वाहनचालकाने दिली आहे.

दरम्यान, नागरिकांनी संबंधित प्रशासनाने तातडीने कारवाई करून बेकायदा बाजार हटवावा किंवा नियोजित ठिकाणी स्थलांतरित करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा भविष्यात ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## तटकरे महाविद्यालयात प्रमाणपत्र वितरण

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथे शनिवारी (दि.२) मे रोजी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी केले. प्रस्तविकाच्या माध्यमातून महाविद्यालयाचा मागील शैक्षणिक वर्षाचा आलेख त्यांनी सादर केला, तसेच महाविद्यालय विकासाच्या वाटेवर कसे कार्यरत आहे याची मांडणी केली. या समारंभाची



सुरुवात स्नातक व विद्वत जन यांच्या मिरवणुकीने करण्यात आली.

यावेळी चंद्रकांत रोडे यांनी ज्ञान हीच या जगातील सर्वात मोठी शक्ती आहे हे लक्षात घेत स्नातकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सी. डी. देशमुख यांसारख्या महामानवांच्या जीवनातून शिक्षणाची व सामाजिक बांधिलकीची प्रेरणा घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करावी व आपले, गावाचे व आपल्या या महाविद्यालयाचे नाव उज्वल करण्यासाठी कटिबद्ध रहावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या समारंभासाठी मारुती शिर्के, विठ्ठल जोशी, श्रीराम कजबजे, महादेव बैकर, दीपक कोटिया, चंद्रकांत खातू, प्रमोदिनी मेकडे, दिलीप ढाकणे, प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या समारंभाचे निवेदन डॉ. भगवान लोखंडे यांनी केले. पदवी प्रमाणपत्र वितरण डॉ. दत्ता कुंटेवाड यांनी तर कार्यक्रमाचे आभार परीक्षा विभाग प्रमुख डॉ.तृप्ती थोरात यांनी मानले. हा समारंभ यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी बहुमोल सहकार्य केले. या समारंभासाठी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व विद्याशाखांचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक,पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निलेश डेकोरेटर्सनी जपली सामाजिक बांधिलकी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

वाहतुकीचे नियम हे दंडात्मक कारवाईसाठी नाहीत तर वाहनचालक यांच्या सुरक्षिततेसाठी असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांनी केले. त्याचाच एक भाग म्हणून या भागातील निलेश डेकोरेटर्स यांच्याकडून नेरळ पोलीस ठाण्यासाठी वाहतूक नियमांची नियमावली असलेले फलक बनवून दिले आहेत.

रायगड पोलीस अधीक्षकांच्या सूचनेनेजिल्ह्यातवाहतूकनियमांबाबत व्यापक जनजागृती मोहीम आणि नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई सुरू आहे. नेरळ परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक नियमांचे पालन व्हावे, या उद्देशाने रायगड जिल्हा पोलीस आणि नेरळ पोलीस ठाण्यामार्फत एक विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेद्वारे नागरिकांना रहदारीचे नियम पाळण्याचे आवाहन केले जात आहेत.

नेरळ परिसरातील वाहनचालक वाहतूक नियमांची माहिती मिळावी आणि अपघातांचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी ही जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. या सामाजिक उपक्रमात नेरळ भागातील निलेश भोईर यांचे विशेष सहकार्य लाभले असून, त्यांच्या माध्यमातून शहराच्या विविध भागांत जनजागृतीपर फलक लावण्यात आले आहेत.

या मोहिमेबाबत माहिती देताना सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांनी वाहतुकीचे नियम हे दंडात्मक कारवाईसाठी नसून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी असल्याचे सांगितले आहे.

**आदिवासी नागरिकांकडून नाराजी व्यक्त** | **शासनाचा 300 कोटींचा नुकसान**

# उरण तालुक्यात मातीची चोरी

**। उरण । प्रतिनिधी ।**

महसूल खात्याचे सर्व अधिकारी गाढ झोपेत असतानाच उरण तालुक्यातील चाणजे, चिर्ले, वेश्वी, दिघोडे, विंधने, चिरनेर, कळंबुसरे, मोठी जुई, कोप्रोली, पिरकोण, सारडे, वशेणी, पुनाडे परिसरातून केवळ दिवसाच नव्हे तर रात्रीच्या वेळी देखील माती उत्खनन करण्याच्या प्रकारांचे पेव फुटले आहे. येथील अनेक ठिकाणी डोंगरांना या कंत्राटदाररुपी घुशी लागल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे ज्या तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या नाका खाली हे भूमाफिया माती उत्खनन करीत आहे, याची सुतराम माहिती देखली या अधिकाऱ्यांना नसल्याने शासनाचा ३०० कोटी हुन अधिक नुकसान होत आहे.

उरण तालुक्यात अनेक ठिकाणी सरकारी वनविभाग, गुरचरण, खासगी अशा जमिनीतुन माती माफिया, गाव पुढारी हे बिंधासपणे माती चोरुन विकासकाला विकत आहेत. हे माती माफिया एखाद्या खासगी जागेवर माती काढणीची परवानगी मिळवून हळूहळू बाजूच्या वन जमिनी, सरकारी जमिनी व गुरचरणाच्या जमिनीवरही ताव मारुन माती काढून नेत असतात. त्यामुळे जंगली प्राण्यांची आश्रयस्थाने नष्ट होण्याचा धोका निर्माण होऊन डोंगर बोरके होत आहेत.

एकीकडे माती उत्खननाला बंदी असताना दुसरीकडे मात्र दिवस-रात्र जेसीबी, पोकलेन मशिन चालवला



जात आहे. राजरोसपणे डंपरच्या माध्यमातून या मातीची वाहतूक देखील सुरू आहे. मात्र, संबंधित गाव सरपंच व ग्रामसेवक व तलाठी, मंडल अधिकारी व तहसीलदारांना याकडे लक्ष देण्यास वेळ नाही.

उरण तालुक्यातील चाणजे, चिर्ले, वेश्वी, दिघोडे, विंधने, चिरनेर, कळंबुसरे, मोठी जुई, कोप्रोली, पिरकोण, सारडे, वशेणी, पुनाडे इत्यादी भागामध्ये मोठ्या प्रमाणात माती उत्खनन सुरू असल्याने शासनाची अंदाजे ३०० कोटीहून जास्त नुकसान झाल्याचा आरोप शेतकरी, आदिवासी नागरिक व्यक्त करत आहे.

मात्र, तहसीलदारांना या घटनेची माहिती नाही. तरी तहसीलदारांनी घटनास्थळावर पाहणी करत उत्खनन झालेल्या डोंगर भागाचे मोजमाप मोजणी कार्यालयातर्फे केल्यानंतर नेमकी किती माती चोरी झाली आहे व शासनाचे किती नुकसान झाले आहे हे समजू शकेल. मात्र, उरण तालुक्यात कुंपणाने शेत खाण्याचा प्रकार होत असल्याने न्यायाची अपेक्षा करणार तरी काय असा सवाल सध्या शेतकरी, आदिवासी नागरिक व्यक्त करत आहेत.

**महत्त्वाचे प्रकल्प**

जेएनपीए बंदर, नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे उरण तालुक्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे २०२१ पासून विकासकांनी, भांडवलदारांनी तालुक्यात विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

# मराठीला मिळणार जागतिक व्यासपीठ

## विश्वमंगल मराठी फाउंडेशनची स्थापना



। रायगड । प्रतिनिधी ।

१ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात विश्वमंगल मराठी फाउंडेशन चा भव्य शुभारंभ सोहळा आळंदी येथील फ्रुटवाले धर्मशाळा सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध भागांतून तसेच देश-विदेशातून अनेक उद्योजक व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शुभारंभ सोहळ्यास आमदार सुभाष बापू देशमुख, प्रख्यात वक्ते व ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी, तसेच राज्यभरातील अनेक मान्यवर नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून जागतिक स्तरावरील नामांकित उद्योजक संजय वायाळ, डॉ. उदय भोसले आणि आप्पासाहेब कोंढारे हे विशेषतः परदेशातून उपस्थित राहिले होते.

कार्यक्रमाची सुरुवात आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे महापूजन करून करण्यात आली. मंदिर समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर वारकऱ्यांच्या उपस्थितीत माऊलींच्या मंदिरापासून सभागृह पर्यंत दिंडी काढण्यात आली.यानंतर सभागृहात मुख्य कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले तसेच विश्वमंगल मराठी फाउंडेशनच्या लोगो व वेबसाईटचे अनावरण करण्यात आले. या सोहळ्यामुळे कार्यक्रमात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

प्रास्ताविक भाषणात आमदार सुभाष बापू देशमुख यांनी फाउंडेशनची स्थापना करण्यामागील प्रेरणा स्पष्ट केली. मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी शाळा आणि मराठी उद्योगांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विश्वमंगल मराठी फाउंडेशन कार्यरत राहील, असे त्यांनी सांगितले. तसेच लोकल टू ग्लोबल आणि ग्लोबल टू लोकल ही संकल्पना विशद करत उपस्थितांना फाउंडेशनच्या कार्यात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले.

विश्वमंगल मराठी फाउंडेशनचा सामाजिक संदेश घेऊन पंढरपूर ते आळंदी अशी सायकलवारी करणाऱ्या सायकल्स क्लब, पंढरपूरच्या सायकलवीरांचा स्वागत-सन्मान या सोहळ्यात करण्यात आला. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.याशिवाय फाउंडेशनच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्रातील विविध गावांतील जिल्हा परिषद शाळा दत्तक घेणाऱ्या उद्योजकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच आळंदी येथे विश्वमंगल मराठी फाउंडेशनची पहिली स्थानिक समिती स्थापन करण्यात आली असून समितीतील सदस्यांचाही सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचा समारोप भावपूर्ण वातावरणात पसायदान गाऊन करण्यात आला. विश्वमंगल मराठी फाउंडेशनच्या माध्यमातून मराठी भाषा, संस्कृती आणि सामाजिक विकासासाठी व्यापक स्तरावर कार्य होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# खासदार बारणे यांनी घेतली रेल्वे विभागीय व्यवस्थापकांची भेट

। कर्जत । प्रतिनिधी ।



कर्जत मधील रेल्वे प्रवाशांना अनेक समस्या भेडसावत आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी मध्य रेल्वे विभागीय व्यवस्थापक हरेश मीना यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करून काही सूचना केल्या.

मात्र कोरोनाच्या पूर्वी थांबत असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना पुन्हा थांबा मिळावा. नवीन रेल्वे स्थानकाला जुने रेल्वे स्थानक कसे जोडता येईल. आरक्षण तिकीट कर्जतपासून मिळावे आदी समस्यांसाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांच्या समवेत मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक हरेश मीना यांची भेट घेतली. यावेळी लोकल गाड्या नवीन स्थानकातून सुटणार असतील तर जुन्या रेल्वे स्थानकातील प्रवाशाना तेथे जाण्यासाठी किंवा तेथून येणाऱ्या प्रवाशांसाठी काय व्यवस्था करणार आहेत? असा प्रश्न बारणे यांनी उपस्थित केला. ही व्यवस्था स्थानक सुरु होण्यापूर्वी होणे गरजेचे आहे. अन्यथा पनवेल रेल्वे स्थानका सारखी परिस्थिती होईल. असे निदर्शनास आणून दिले. त्यावर मीना यांनी तेथील प्रत्यक्ष पाहणी करून पुढील व्यवस्था करण्यात येईल, असे सांगितले.

कर्जत स्थानकावर पहिल्या पासून डबल इंजिन लावण्यासाठी लांबपल्याचा गाड्या थांबतात. त्या अजूनही थांबतात. मात्र कर्जतच्या प्रवाशांना तेथून आरक्षण मिळत नसल्याने त्यांना कल्याण, लोणावळा येथून आरक्षण करावे लागते व त्या स्थानकांवर जाऊन गाडी पकडावी लागते. त्यामुळे हे मोठे त्रासदायक होते. कर्जत स्थानकापासून आरक्षण द्यावे. असे बारणे यांनी सूचित केले. त्यावर मीना यांनी तो प्रस्ताव टाकण्यात आला आहे. त्यावर निर्णय झाल्यावर ते सुरु करण्यात येईल,असे सांगितले. लांब मात्र कोरोनाच्या पूर्वी थांबत असलेल्या लांब पल्ल्याच्या पुन्हा थांबवाव्यात यावर त्या गाड्यांच्या थांब्याबाबत आम्हाला अधिकार नाहीत. मात्र तुमचे म्हणणे आम्ही संबंधित विभागाकडे पाठवू, असे सांगितले.

कर्जतकरांना पुण्याहून कर्जतला येण्याकरिता प्रगती एक्सप्रेस व डेक्कन एक्सप्रेस या वेळेच्या दरम्यान कर्जत यायचे असेल तर कसे येणार? असा प्रति प्रश्न पंकज ओसवाल यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना विचारताच रेल्वे अधिकारींनी ओसवाल यांना तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत पण सदर विषय हा आमच्या कक्षेत येत नाही पण तुमची मागणी आम्ही वरिष्ठांपर्यंत नक्की पोहोचवू असं आश्वासन दिले.

# नेपाळमधील कामगारांना मार्गदर्शन

। उरण । प्रतिनिधी ।



१ मे जागतिक कामगार दिनानिमित्ताने नेपाळ ट्रेड युनियन काँग्रेसकडून राष्ट्रीय परीषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला आयटीएफचे एक्झिक्युटिव्ह बोर्ड मेंबर तथा इंटकचे राष्ट्रीय सविक राष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.

आपल्या मार्गदर्शन पर भाषणात महेंद्र घरत यांनी केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणांचा कडाडून विरोध केला व आम्ही सर्व नेते कामगारांच्या न्याय हक्कासाठी सदैव लढत राहू असे कामगारांना आश्वासित केले.

या परिषदेसाठी आयटीएफ लंडनचे जनरल सेक्रेटरी स्टीफन कॉटन, एसीया पॅसिफिक रिजनल सेक्रेटरी अब्दुल गनी सारंग, नेपाल काँग्रेस अध्यक्ष गगन थापा, काँग्रेस ज्येष्ठ नेते शेखर कोईराला, नेपाळ ट्रेड युनियनचे अध्यक्ष योगेंद्र कुमार, नेपाळ ट्रेड युनियन तथा आयटीएफचे एक्झिक्युटिव्ह बोर्ड मेंबर अजयकुमार राय आदी उपस्थित होते. या परीषदेनंतर महेंद्र घरत यांनी नेपाळचे अध्यक्ष रामचंद्र पौडेल यांची भेट घेतली. नेपाळ ट्रेड युनियन काँग्रेस तर्फे परीषदेचे अतिशय चांगले नियोजन करण्यात आले होते.

# मुख्याध्यापिका सुनिता म्हात्रे यांचे शैक्षणिक कार्य कौतुकास्पद

। खरोशी । प्रतिनिधी ।



मुख्याध्यापिका सुनिता म्हात्रे शिक्षक म्हणून काम करताना प्रामाणिकपणे सेवा करून विद्यार्थ्यांना चांगली शिस्त व संस्कार देऊन ३५ वर्ष विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी घेतलेली मेहनत कौतुकास्पद व अभिमानास्पद असून ते वंदनीय आहे एवढेच काय तर सर्वांना घडवणारा शिक्षक भेदभाव न करून सर्वांना समान शिक्षण व संस्कार देऊन केलेले काम पाहता शाळा चालवताना अत्यंत जिकिरीचे काम केले.कलेने प्रविण गुणसंपन्न अशा सुनीता बाईंनी शिस्त व संस्कार दिले.विद्यार्थी घडवताना तनमनधनाने कष्टाने काम केले.

त्यांनी शाळेत केलेले कार्य उत्तम आहे म्हणूनच आज हा एवढा मोठा जनसमुदाय उपस्थित दिसतो यातच त्यांच्या कार्याची पोचपावती पहायला मिळते.त्यांनी पेण नगरपालिका क्षेत्रातील विविध शाळांमध्ये विद्यार्थी घडविण्याचे केलेले कार्य निश्चितच कौतुकास्पद असून त्यांनी शिक्षणाचा ठसा उमटवला अशा चांगले काम करणाऱ्या शिक्षकांचा मी आदर करतो असे सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना नगरसेविका मालती तुकाराम म्हात्रे यांनी सांगितले.

पेण नगरपालीका शाळा क्रमांक २ येथील मुख्याध्यापिका सुनिता गोपीनाथ म्हात्रे यांच्या सेवा निवृत्त निमित्त विशेष सत्कार समारंभाचे आयोजन आगरी समाज विकास सभागृहात करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष निवृत्त न्यायाधीश आणि आगरी विकास मंचचे अध्यक्ष डी.पी. म्हात्रे होते. जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, उपशिक्षणाधिकारी संगीता माने, पंचायत समिती सदस्य विवेक म्हात्रे, सत्कारमूर्ती सुनिता म्हात्रे, गोपीनाथ म्हात्रे पेण नगरपालिका महिला व बाल कल्याण सभापती कलावती पाटील, नगरसेविका मालती तुकाराम म्हात्रे, नगरसेविका सुशिला ठाकूर, पेण न.पा.बांधकाम सभापती स्मिता माळी, नगरसेवक अभिराज कडू, निवृत्त मुख्याध्यापक विठ्ठल माने, नगरसेविका सुजाता डाकी माजी उपनगराध्यक्ष जितेंद्र ठाकूर कृ.उ.बाजार समिती उपसभापती प्रफुल्ल म्हात्रे, माजी सरपंच एकनाथ ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

सत्कार मूर्ती सुनिता म्हात्रे यांनी सांगितले की १५ जुलै १९८९ पासून नोकरीची सुरुवात खालापूर तालुक्यात करून १५ वर्ष सेवा केली तर २००५ पासून पेण नगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळांमध्ये २० वर्षे अशी ३५ वर्ष सेवा करताना शिक्षकांनी विशेष सहकार्य करून विद्यार्थी व पालकांनी माझा विश्वास सार्थ केल्याने मला शैक्षणिक क्षेत्रात काम करताना सर्वांचे सहकार्य लाभले. अध्यक्षीय भाषणात डी. पी.म्हात्रे यांनी सांगितले की ३५ वर्ष शैक्षणिक क्षेत्रात विशेष योगदान देऊन केलेले कार्य पवित्र भावनेने करून विद्यार्थ्यांना दिलेले ज्ञान निश्चितच कौतुकास्पद आहे. शेवटी आभार व्यक्त करून समारोप करण्यात आले.

# लोहारे शिव मंदिराच्या जिर्णोध्दाराचे भूमिपूजन

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील लोहारे येथील पुरातन स्वयंभू शिव मंदिराच्या जीर्णोध्दार कामाचा शुभारंभ मंत्री भरत गोगावले यांच्याहस्ते करण्यात आला. या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी पोलादपूर तालुक्यातील व विभागातील ग्रामस्थ, महिला, भगिनी, शिवसेना व युवा सेनेचे पदाधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी मंत्री गोगावले यांनी सांगितले की, लोहारे येथील हे स्वयंभू शिव मंदिर श्रध्दास्थान असून या मंदिराच्या जिर्णोध्दारामुळे परिसरातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरण असमृध्द होणार आहे. मंदिर विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. या पवित्र कार्यात ग्रामस्थांनी दाखविलेल्या सहभागाबद्दल समाधान व्यक्त करीत भविष्यातही अशा विकासकामांना प्राधान्य दिले जाईल, असेही मंत्री गोगावले म्हणाले.

## डॉक्टर्स असोसिएशन ऑफ महाडच्या वार्षिक अधिवेशनामध्ये

# डॉ.सुजाता दाभाडकर व डॉ.मोहन मेथा यांना जीवनगौरव पुरस्कार

। पोलादपूर । प्रतिनिधी ।



डॉक्टर्स असोसिएशन ऑफ महाड या महाड, पोलादपूर, बिरवाडी येथील डॉक्टरांच्या संघटनेचे वार्षिक अधिवेशन नुकतेच महाड येथे आयोजित करण्यात आले. याप्रसंगी विख्यात नेत्ररोग तज्ञ डॉ.सुजाता दाभाडकर व दासगावचे डॉ.मोहन मेथा यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

औपचारिक उद्घाटन समारंभ संघटनेचे अध्यक्ष डॉ.नितीन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व उपाध्यक्ष डॉ. स्वप्नील जाधव, खजिनदार डॉ.परेश महाडिक, सचिव सागर रहाळकर, सहखजिनदार रोहित पांचाळ, सहसचिव उदय खेडेकर, रायगड मेडिकल असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ.आदित्य महामूणकर, सायंटिफिक कमिटीचे प्रमुख डॉ. शेखर दाभाडकर व डॉ.राजेश शिंदे यांच्या उपस्थितीत धन्वंतरी पूजन व दीप प्रज्वलनाने झाला. यानंतर प्रसिध्द नेत्ररोग तज्ञ डॉ.सुजाता दाभाडकर व दासगावचे डॉ.मोहन मेथा यांना त्यांच्या वैद्यकीय व सामाजिक सेवेबद्दल जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. स्व.डॉ.नितीन कुद्रीमोती स्मरणार्थ सुरू केलेल्या बीजभाषणात डॉ. श्रीकांत रानडे यांचे अतिशय सुंदर व संस्मरणीय व्याख्यान झाले. या अधिवेशनाच्या सकाळच्या सत्रात डॉ.जितेंद्र गव्हाणे, डॉ.अमित मिरजोलकर, डॉ.पुष्कर चिरमाडे, डॉ.एहेसान शेख, वसंत कुलकर्णी यांची वैद्यकीय विषयावर उद्बोधक व्याख्याने झाली.

या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. राजेश शिंदे, डॉ. सपना कुडतरकर, डॉ. प्रणाली महामूणकर, डॉ.श्रध्दा जाधव, डॉ. सारिका जोगदंड, अनघा सरकले यांनी केले.

# श्रीराजने भारत टॅलेंट सर्च परीक्षेत मिळवले सुयश

। खरोशी। प्रतिनिधी।



आयएसओ मानांकन मिळवलेल्या जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सेमी इंग्लिश खारपाडा शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. सन २०२५ -२६ या शैक्षणिक वर्षात पार पडलेल्या भारत टॅलेंट सर्च परीक्षेत संपूर्ण राज्यातून घेण्यात येणाऱ्या या परीक्षेत पेण तालुक्यातील खारपाडा येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी श्रीराज ज्योती दिनकर पाटील याने स्पर्धा परीक्षेत उत्तम यश मिळवले असून त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. श्रीराजने राज्यात १८२ वा जिल्ह्यात ११ वा तर केंद्रात ५ वा क्रमांक पटकाविला आहे.

यापूर्वी पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत श्रीराजने स्कॉलरशिप मिळवली आहे . श्रीराज चे आईवडील खारपाडा शाळेतच जिल्हा परिषद शिक्षक असून यांनी शाळेचे मुख्याध्यापक प्रविण पाटील यांच्या विनंती नुसार आपल्याच शाळेत ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याने हे सुयश प्राप्त केले आहे.आज खारपाडा जिते पंचक्रोशीसह तालुका व जिल्ह्यातून श्रीराज व खारपाडा शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबीर

**कोर्लई :** सांबरी-महादूनगर येथील उद्योजक आणि प्रगतिशील शेतकरी वात्सल्य वृद्धाश्रमाचे मालक संतोष पाटील यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त नागरिकांसाठी रायगड जिल्हा परिषद, प्राथमिक आरोग्य केंद्र चिखली तर्फे मोफत तपासणी शिबिर व पेझारी येथील पशु वैद्यकीय केंद्रातर्फे जनावरांसाठी तपासणी शिबिर,भारतीय पोस्ट खाते रायगड तफे नवीन आधार नोंदणी मोफत व सुधार, दुरूस्ती शिबिराचे आयोजन सोमवार दिनांक ४ मे रोजी सकाळी१० ते दुपारी ३ यावेळेत आयोजित करण्यात आले आहे.

# गोष्ट धमाल गावाची नाट्यप्रयोगाला रसिकांचा उदंड प्रतिसाद

। चिरनेर । प्रतिनिधी ।

पिरकोन येथील श्री शिवशंकर नाट्य मंडळाच्या वतीने गोष्ट धमाल गावाची या तुफान विनोदी सामाजिक दोन अंकी नाटकाच्या शुभारंभाच्या प्रयोगाचे सादरीकरण (दि. ३०) कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले.

या नाटकाचे लेखन, दिग्दर्शन किशोर पाटील यांचे असून, दिग्दर्शनात त्यांनी कसब वापरले आहेत. राज्य नाट्य स्पर्धेत तीन पुरस्कार प्राप्त केलेल्या हाल्या मारतय हेलपाटा या नाटकानंतर त्यांनी गोष्ट धमाल गावाची या नाटकाची निर्मिती करून ते पिरकोन या गावी सादर करण्यात आले. या नाटकाला देखील प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला. नाटकात किशोर पाटील जोत्सना पाटील यांच्यासह अन्य कलाकारांनी आपल्या अभिनयातून भूमिका बजावल्या. निर्मिती शेखर पाटील यांची होती. तर अध्यक्ष राजेंद्र गावंड यांनी या मंडळाची नाट्य परंपरा चाळीस वर्ष जोपासली आहे. या नाट्य प्रयोगाच्या उद्घाटनावेळी व्यासपीठावर संजय शिंदे, महेश म्हात्रे, डॉ.अरुणकुमार भगत, प्रा. एल.बी.पाटील, ए.डी पाटील , सुधाकर पाटील, जीवन गावंड, मुकुंद गावंड, कृष्णा पाटील, प्रारंभी गावंड आदी उपस्थित होते.

# ताराबंदर ग्रामस्थांकडून वनमंत्री गणेश नाईक यांची भेट

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

ताराबंदर ग्रामस्थ मंडळाच्या वतीने आमदार पाटील यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची देखील भेट घेण्यात आली. या भेटीदरम्यान स्थानिक मच्छिमारांवर होत असलेल्या अन्यायाची माहिती देण्यात आली असून, पारंपरिक मच्छिमारांचे हक्क अबाधित राखण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

पारंपरिक मच्छिमारांवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भात ताराबंदर ग्रामस्थ मंडळाच्या वतीने आमदार रमेश पाटील यांची भेट घेण्यात आली. पिढ्यानपिढ्या स्थानिक कोळी बांधवांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहासाठी, पोटापाण्यासाठी चाललेल्या मासेमारी धंद्यावरील हक्कांना धोका निर्माण झाला असून, यासाठी न्याय मिळालाच पाहिजे, असा ठाम आग्रह भेटीदरम्यान करण्यात आला.

ताराबंदर परिसरात सुरू असलेल्या अनधिकृत कामांमुळे स्थानिक मच्छिमारांच्या पारंपरिक हक्कांवर गदा येत असल्याची सविस्तर माहिती आमदार पाटील यांना देण्यात आली. समुद्रकिनाऱ्यावरील वहिवाटीचे रस्ते बंद होणे, मासेमारी व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या जागांवर अडथळे निर्माण होणे आणि यामुळे मच्छिमारांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. यासंदर्भातील सविस्तर लेखी निवेदनही सादर करण्यात आले. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार रमेश पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पारंपरिक कोळी बांधवांवर होत असलेले अन्याय दूर करण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी आमदार रमेश पाटील, ताराबंदर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष भालचंद्र वरसोलकर, सचिव प्रतिक कणगी, हरेश भगत, रंजन भोईर, रमेश पाटील, महादेव, मच्छिंद्र कुलाबकर, नागोजी, हरिश्चंद्र मोती आदी उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# उष्माघाताच्या हाहाकाराचा रसायनीकरांना इशारा

। रसायनी । प्रतिनिधी ।

राज्यभर उष्णतेचा पारा प्रचंड चढला असून नागरीकांच्या अंगाची अक्षरशः लाहीलाही होत आहे. खालापूर तालुक्यात एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यापासून सूर्याने रौद्र रूप धारण केले आहे. मागील काही दिवसांपासून खालापूर तालुक्याचा तापमान पारा सातत्याने ४० अंश सेल्सिअसच्या आसपास स्थिरावला असून, कडक उन्हामुळे अक्षरशः नागरीक होरपळून निघत आहे.

वाढत्या उष्णतेमुळे दुपारी १२ ते ४ या वेळेत शहरातील वर्दळीच्या रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. रात्रीच तापमान ही वाढत आहे. यंदाचा उन्हाळा अधिक तापदायक ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे. सध्या उन्हामुळे घराच्या बाहेर फिरणे अवघड झाले आहे.

उन्हात गेल्याने अंगाची लाही लाही होत आहे. उन्हाचा पारा चांगलाच वाढला आहे. दुपारचे तापमान चाळीशी पार गेले आहे. रात्रीचे तापमानही वाढत आहे. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी सतर्कता बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. हवामान खात्याकडून राज्यभर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.दुपारी १२ ते ४ घराच्या बाहेर न पडण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

राज्यभरासह खालापूर तालुक्यात सूर्य आग ओकत असल्याने शहरासह तालुक्यातील जनजीवनावर परिणाम झाला आहे. तर बाजारपेठ भागातील रस्ते दुपारी निर्मनुष्य होत असून अघोषितची संचारबंदीसारखी स्थिती निर्माण झाली आहे. सकाळपासुन तापमान वाढत आहे. दुपारी घराबाहेर पडणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे टोप्या, छत्र्या बाहेर आल्या आहेत. उन्हाने रस्ते तापू लागले आहेत. थंड पेयाच्या दुकानात नागरीकांची गर्दी वाढली आहे. दिवसासोबत रात्रीही नागरिक घामाघूम होत आहेत.

## नागरिकांसाठी खबरदारी घेण्याचे महत्वाचे आवाहन

**उष्णतेची लाट आणखी तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी स्वतःची काळजी घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे. विशेषतः दुपारी १२ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत घराबाहेर पडणे टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे. भरपूर पाणी पिणे, हलके आणि सैल कपडे वापरणे, डोक्यावर टोपी किंवा कापड ठेवणे आणि उन्हात दीर्घकाळ उभे राहणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. चक्कर येणे, डोकेदुखी, ताप, अशक्तपणा किंवा उलट्या यांसारखी लक्षणे दिसल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही सांगण्यात आले आहे.**

## रस्त्यांवर शुकशुकाट

**वाढत्या उन्हामुळे नागरिकांना दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. उन्हाच्या तीव्र चटक्यांमुळे डोळ्यांची जळजळ वाढत्या उष्म्याचा फटका सर्वसामान्यांच्या आरोग्याला बसत असून, उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे. या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासकीय आणि आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. सामान्य रुग्णालयात खास उष्माघात उपचार कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.**

# मुंबई इंडियन्सची निराशाजनक कामगिरी

## ।। प्लेऑफचा मार्ग पूर्णपणे बंद? ।। क्रिकेट विश्वात चर्चेचा विषय

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सची आयपीएल २०२६ मधील कामगिरी अत्यंत निराशाजनक ठरत आहे. शनिवारी (दि.२) चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध झालेल्या मोठ्या सामन्यात त्यांना आणखी एक पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे हा मुंबई इंडियन्सचा ९ सामन्यांमधला ७वा पराभव ठरला आहे. त्यामुळे मुंबई इंडियन्सचा प्लेऑफमध्ये पोहोचण्याचा मार्ग पुर्णपणे बंद झाला का? हा क्रिकेट विश्वात चर्चेचा विषय ठरला आहे.

शनिवारी झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना, मुंबई इंडियन्सने आपल्या २० षटकांत ७ गड्यांच्या मोबदल्यात १५९ धावांची एकूण धावसंख्या उभारली. मुंबई इंडियन्सकडून नमन धीरने शानदार अर्धशतक झळकावले. त्याने यावेळी ५७ धावांची खेळी करत संघासाठी सर्वाधिक धावा केल्या. नमन धीरने ३७ चेंडूंचा सामना करताना ४ चौकार आणि ३ षटकार ठोकले. दरम्यान, रायन रिकलटनने ३७ धावांचे योगदान दिले. तर वील जॅक्स (१), सुर्यकुमार यादव (२१), तिलक वर्मा (३), हार्दिक पांड्या (१८), रॉबिन मीन्झ् (५), क्रिश भगत (३) आणि ट्रेंट बोल्ट (७) यांनी मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांना निराश केले. यावेळी चेन्नई सुपर किंग्सकडून अंशुल कंबोजने ३ गडी बाद केले. तर, नूर अहमदने २ फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला.

मुंबई इंडियन्सच्या धावसंख्येला प्रत्युत्तर देताना, चेन्नई सुपर किंग्सने १९व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर १६० धावांचे लक्ष्य गाठले. त्यामध्ये कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या आक्रमक अर्धशतकाचा सिंहाचा वाटा होता. ऋतुराजने ४८ चेंडूंत ६७ धावांची खेळी केली आणि तो नाबाद राहिला. त्याच वेळी, कार्तिक शर्मानेही ३९ चेंडूंत एक शानदार अर्धशतक झळकावले. कार्तिक आणि गायकवाड यांनी तिसऱ्या गड्यासाठी ९८ धावांची भागीदारी रचली. कार्तिकने चौकार मारून चेन्नई सुपर किंग्सचा विजय निश्चित केला. त्याने ४० चेंडूंत ५४ धावांची नाबाद खेळी केली, ज्यामध्ये ४ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता.

या पराभवानंतर मुंबई इंडियन्स आयपीएल २०२६ मधून बाहेर पडणारी पहिली टीम ठरली आहे का? त्यांचा प्लेऑफचा मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे का? अशी चर्चा सध्या क्रिकेट वर्तुळात सुरू झाली आहे. मात्र, अधिकृतरीत्या तसे झालेले नाही. मुंबई इंडियन्सने आतापर्यंत ९ सामने खेळले असून त्यात फक्त २ विजय मिळवले आहेत, तर ७ पराभव झाले आहेत. सध्या मुंबई इंडियन्सकडे ४ गुण आहेत आणि ते गुणतालिकेत ९ व्या स्थानावर आहेत. मुंबई इंडियन्सचे अजून ५ सामने बाकी आहेत. हे सर्व सामने त्यांनी जिंकले तरीही ते जास्तीत जास्त १४ गुणांपर्यंतच पोहोचू शकतात. आयपीएल इतिहासात १४ गुणांसह प्लेऑफमध्ये जाणे अत्यंत कठीण राहिले आहे. त्यामुळे आता मुंबई इंडियन्सचे भवितव्य पूर्णपणे त्यांच्या हातात राहिलेले नाही. प्लेऑफसाठी त्यांना उरलेले सर्व सामने जिंकावे लागतील. एकही चूक झाली तर ते स्पर्धेतून बाहेर पडू शकतात. तसेच, त्यांना इतर निकाल आणि पावसाचा अडथळा यावरही अवलंबून राहावे लागेल.



### प्लेऑफमध्ये पोहोचणे कठीण

मुंबई इंडियन्सचे पुढील सामने लखनऊ सुपर जायंट्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, पंजाब किंग्स, कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यासोबत होणार आहेत. या पाचपैकी तीन संघ सध्या अंतिम चारमध्ये आहेत. त्यामुळे मुंबईसाठी आव्हान अधिक कठीण झाले आहे. प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी त्यांना या तिन्ही मजबूत संघांना हरवणे अत्यावश्यक आहे. शेवटी, जर गुण बरोबरीत आले तर नेट रन रेट निर्णायक ठरेल. मुंबईचा नेट रन रेट अंतिम चारमधील १४ गुणांवर अडकलेल्या संघापेक्षा चांगला असेल तरच त्यांना प्लेऑफचे तिकीट मिळू शकते.

## निवडक

### अन्वी हिंगेची ऐतिहासिक कामगिरी



**पुणे** : आंबेगाव येथील अन्वी हिंगे या अवघ्या ८ वर्षांच्या बुद्धिबळपटूने जागतिक स्तरावर इतिहास रचत फिडे नऊ वर्षांखालील मुलींच्या गटात जागतिक क्रमवारीत प्रथम क्रमांकाचे स्थान पटकावले आहे. अन्वी ही जगातील सर्वात लहान वयाची महिला कँडिडेट मास्टर (डब्ल्यूसीएम) ठरली असून नऊ वर्षांखालील वयोगटातील जगातील एकमेव डब्ल्यूसीएम बनली आहे. चिंचवड येथील एलप्रो इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी असलेल्या अन्वीने जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ती महाराष्ट्राच्या ७ वर्षांखालील मुलींची राज्य विजेती ठरली असून सध्या महाराष्ट्र ९ वर्षांखालील मुलींच्या राज्य स्पर्धेत उपविजेती आहे. राष्ट्रीय स्तरावर तिने राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत कांस्यपदक पटकावले आहे.

### प्लेऑफच्या ठिकाणांची घोषणा कधी?



**नवी दिल्ली** : आयपीएल २०२६चा अर्ध्याहून अधिक हंगाम संपला आहे; परंतु, प्लेऑफ सामन्यांच्या ठिकाणांबाबत सस्पेन्स अजूनही कायम आहे. यादरम्यान बीसीसीआयने संकेत दिले आहेत की, यावर लवकरच मोठा निर्णय घेतला जाईल. तत्पुर्वी आयपीएलच्या लीग स्टेजच्या वेळापत्रकाची घोषणा २ टप्प्यात झाली होती. बंगाल, आसाम आणि तामिळनाडूमध्ये निवडणुकीच्या तारखांमुळे बीसीसीआयला दोन वेळा वेळापत्रक जाहीर करावे लागले होते. मात्र, अद्याप प्लेऑफच्या वेळापत्रकाची घोषणा करण्यात आलेली नाही. आता बीसीसीआकडून एक मोठी अपडेट समोर आली आहे. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी, बोर्ड प्लेऑफ आणि फायनलसाठी योग्य ठिकाण ठरवण्यावर काम करत आहे आणि पुढच्या एक-दोन दिवसांत स्थिती स्पष्ट होईल, असे सांगितले. आता आयपीएलच्या चालू हंगामाचा अंतिम सामना दि.३१ मे रोजी खेळवला जाणार हे निश्चित आहे. तर, प्लेऑफचे सामने दि.२६ मे पासून सुरू होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सर्वांच्या नजरा अंतिम निर्णयाकडे लागल्या आहेत.

# भारतीय नौदलाची चषकावर मोहोर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बंड्या मारूती संघाने आपल्या अमृत महोत्सवी वर्ष आणि हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून अखिल भारतीय पुरुष व्यवसायिक कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. भारतीय नौदलाने स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. तसेच, नौदलाचा भरत हुडा स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. ही स्पर्धा मुंबईतील ना.म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे मॅट वर खेळविण्यात आल्या.

### ■ भरत हुडा ठरला सर्वोत्तम खेळाडू




अखिल भारतीय पुरुष व्यवसायिक कबड्डी स्पर्धेचा अंतिम सामना भारतीय नौदल आणि यु. पी. योद्धा यांच्यात पार पडला. या दोन्ही संघानी सावध सुरुवात केली. पहिली काही मिनिटे सावध खेळ केल्यानंतर नौदलाने आपला खेळ गतीमान करीत पहिला लोण देत १६-१० अशी आघाडी घेतली. लोण घेतल्यानंतर योद्धाच्या गगन गौडाने तुफानी चढाई करीत ३ गडी टिपत सामन्यात चूरस निर्माण केली. परंतु, नौदालाने पूर्वार्धात आणखी एक लोण दिला. विश्रांतीला २७-१८ अशी आघाडी नौदलाकडे होती. उत्तरार्धात शिलकी गड्याची पकड करीत दुसरा लोण देत आपली आघाडी ३०-१८ अशी केली. त्यानंतर झटपट तिसरा लोण देत ४१-२३ अशी आघाडी वाढविली. यावेळी यु.पी.ला एकही लोण देता आला नाही. त्यामुळे या अंतिम सामन्यात सामन्यात भारतीय नौदलाने यु.पी. योद्धाचा प्रतिकार ४६-२७ असा सहज मोडून काढत रोख रक्कम पाच लाख रुपये व चषक आपल्या नावे केला. उपविजेत्या यु.पी.ला रोख रक्कम तील लाख रुपये व चषकावर समाधान मानावे लागले. नौदलाच्या या विजयात भरत हुडाने चढाईत १५, तर रोहित तोमरने ११ गुण घेत सर्वोत्तम कामगिरी केली. त्याला नितेशने ४, तर रिंकूने ३ पकडी करीत उत्तम साथ दिली.

### सुनील नरेनने रचला इतिहास

**नवी दिल्ली** : आयपीएलमध्ये रविवारी (दि.३) पहिला सामना सनरायझर्स हैद्राबाद विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात खेळला गेला. केकेआरने प्रथम गोलंदाजी करताना त्यांना चांगलेच आव्हान दिले. त्यांचास्टार फिरकीपटू सुनील नरेनने आयपीएलच्या इतिहासात २०० बळींचा टप्पा गाठला आहे. त्यामुळे तो आयपीएलमध्ये २०० बळी घेणारा पहिलाच परदेशी गोलंदाज ठरला आहे.

### आसनेवाडी कबड्डी संघाची बाजी

**पाली-गोमाशी** : श्री वाघेश्वर प्रसन्न आंबिवली यांच्यावतीने सुधागड तालुका आदिवासी कातकरी समाज असो.च्या मान्यतेने शनिवारी (दि.२) कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुक्यातील नामवंत संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील अंतिम सामना आसनेवाडी विरुद्ध सिद्धेश्वर या संघात पार पडला. यावेळी आसनेवाडी संघातील खेळाडूंनी दर्जेदार खेळ करत अंतिम विजयावर शिक्का मोर्तब केले. तर, सिद्धेश्वर या संघाला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. तसेच, तृतीय क्रमांक वावलोळी आणि चतुर्थ क्रमांक उन्हेरे या संघांनी पटकावला. या स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई शुभम वाघमारे, उत्कृष्ट पक्कड मोरेश्वर वाघमारे या खेळाडूंना देखील सन्मानित करण्यात आले.




**अजिंक्यपद स्पर्धेला दमदार सुरुवात | पहिल्याच दिवशी रंगला थरार**

# मुंबईत खो-खोचा जल्लोष

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि महाराष्ट्र ॲमॅच्युअर स्पोर्ट्स असो.तर्फे किशोर-किशोरी मुंबई जिल्हा अजिंक्यपद खो-खो या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा मुंबईतील ओम समर्थ भारत व्यायाम मंदिरच्या मैदानावर पार पडत आहेत. या स्पर्धेत दोन्ही गटांत १०-१० संघ उतरले असुन, या स्पर्धेने पहिल्याच दिवशी थरार, वेग आणि उत्कंठेची पराकाष्ठा गाठली आहे.



या स्पर्धेचे उद्घाटन ओम समर्थ भारत व्यायाम मंदिराचे अध्यक्ष उन्मेश नरवणे, सचिव दलीप साठे, विश्वस्त संजय पारेख, खजिनदार भावेश पारिख, महाराष्ट्र अम्युचर स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव प्रकाश नकाशे व प्रशिक्षक नितीन पाष्टे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी मुंबई खो-खो संघटनेचे प्र.कार्यवाह सुरेंद्र विश्वकर्मा, खजिनदार डलेश देसाई व विकास पाटील यांच्यासह पदाधिकारी, खो-खो प्रेमी व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किशोरी गटातील सामन्यात नाणेफेक ओम समर्थ व्यायाम मंदिरने जिंकून संरक्षण स्वीकारले, आणि त्याचा पुरेपूर फायदा घेत त्यांनी अमर हिंद मंडळाचा १८-७ (मध्यंतर १८-१) असा एक डाव राखून ११ गुणांनी धुव्वा उडवला. ओम समर्थकडून श्रेया तामणकर, मैत्री नलावडे, स्वरा वांगडे, अनन्य राजे यांनी सलग कामगिरी करत सामन्यावर वर्चस्व गाजवले. अमर हिंदकडून वृषाली मोरे, ईश्वरी शिंदे यांनी प्रयत्न केले, मात्र ते अपुरे ठरले. किशोर गटाच्या लढतीत नाणेफेक ओम साईश्वर सेवा मंडळने जिंकून आक्रमण निवडले. त्यांनी ११-६ असा एक डाव राखून ५ गुणांनी विजय मिळवला. विजयी संघाकडून श्रातिक गामी, आरव साटम, अधिराज गुरव, चिन्मय तांबे यांनी दमदार खेळ केला. पराभूत संघाकडून सार्थ वायंगणकर, कृषल वाघधरे यांनी झुंजार लढत दिली. दुसऱ्या सामन्यात नाणेफेक वैभव स्पोर्ट्स क्लबने जिंकून संरक्षण निवडले, परंतु ओम समर्थ भारत व्यायाम मंदिरने ४-३ (मध्यंतर १-२) असा एक गुणाने थरारक विजय मिळवला. निहाल शिंदे, रुद्र सिंग चव्हाण, ईशान देसाई यांनी निर्णायक भूमिका बजावली. वैभवकडून शुभम माळी, यश जाधव, अनिकेत गुप्ता यांनी जोरदार लढत दिली. तिसऱ्या सामन्यात नाणेफेक विद्यार्थी क्रीडा केंद्रने जिंकून संरक्षण स्वीकारले. त्यांनी ६-४ असा साडेपाच मिनिटे राखून २ गुणांनी विजय मिळवला. विघ्नेश जाधव, कार्तिक तोरस्कर, आर्यन परवाडी, अंशुमन भिडे यांनी संघाला विजय मिळवून दिला. अमर हिंदकडून वेदांत हडशी, जीवन उपाध्याय यांनी चांगली झुंज दिली. चौथ्या सामन्यात नाणेफेक सरस्वती स्पोर्ट्स क्लबने जिंकून आक्रमण निवडले. त्यांनी १६-१० असा ६ गुणांनी विजय मिळवला. विजयी संघाकडून यतीन, शिवम झा, अनिकेत सोनार, भाविक घाग यांनी प्रभावी खेळ केला, तर सरस्वती मंदिर हायस्कूलकडून अलीम, ऋषभ नाडकर यांनी चांगला प्रतिसाद दिला. या स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी खेळाडूंच्या चपळतेने, जिद्दीने आणि थरारक खेळीने प्रेक्षकांची मने जिंकली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)